रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३३४
www.ramprahar.com
शुक्रवार, २१ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रोहा सुरुंग स्फोटप्रकरणी फरारींना अटक व कोठडी/२
'महाराज' चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्याची मागणी/६
वर्ल्डकप सुपर ८ : इंग्लंडचा विंडीजवर दमदार विजय/८

## आज साजरा होणार आंतरराष्ट्रीय योग दिन



**नवी दिल्ली :** शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्यासाठी नियमित योगासने करणे गरजेचे आहे. 'योग' ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. निरोगी जीवनाच्या या पद्धतीला आंतरराष्ट्रीय मान्यताही मिळाली आहे. त्यामुळेच गेल्या दशकभरापासून दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. यंदा हा दिवस शुक्रवारी सर्वत्र साजरा केला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४च्या सप्टेंबरमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर त्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार २१ जून २०१५ या दिवशी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी एक विशेष थीम लक्षात घेऊन योग दिनाचे आयोजन जगभर केले जाते. यंदा 'महिला सक्षमीकरणासाठी योग' अशी थीम ठेवण्यात आली आहे.

# वरुणराजाच्या साथीने शिवराज्याभिषेक

## किल्ले रायगडावर शिवप्रेमींचा जनसागर; सोहळा उत्साहात





**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१वा राज्याभिषेक दिन सोहळा गुरुवारी (दि. २०) तिथीप्रमाणे किल्ले रायगडावर उत्साहात साजरा करण्यात आला. पाऊस आणि दाट धुके अशा आल्हाददायी वातावरणात सनई चौघड्याचे मंगलमय सूर, ढोल ताशांचा गजर आणि शिवरायांच्या जयघोषात हा सोहळा झाला. महाराजांच्या प्रतिमेवर जल आणि दुग्धाभिषेक होताच जमलेल्या हजारो शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी ललकारी दिली.

या सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले आदी उपस्थित होते.

साडेतीनशे वर्षांपूर्वी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. या शिवराज्याभिषेकाचा वर्धापन दिन हा राज्याभिषेक दिनोत्सव समिती, कोकण कडा मित्र मंडळ आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा केला जातो. या वर्षी या सोहळ्याचे भव्य आयोजन शासनाच्या सहकार्याने करण्यात आले होते. यानिमित्ताने गडावरील राजदरबारात असलेली मेघडंबरी फुलांच्या माळांनी सजवण्यात आली होती.

गडावर दोन दिवस विविध धार्मिक विधी, पूजापाठ, वेद मंत्रघोषाने मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गडावरील विविध देवी-देवतांची विधीवत पूजा झाल्यानंतर धर्मशाळा ते राजदरबार अशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढून महाराजांची पालखी राजदरबारात दाखल होताच प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरुवात झाली. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून नंतर प्रतिमेवर सप्तसिंधूंच्या पाण्याने जलाभिषेक करण्यात आला.

सूर्योदयाच्या वेळीचे प्रसन्न वातावरण आणि शिवप्रेमींचा अलोट उत्साह यामुळे रायगडावर उल्हासित चित्र निर्माण झाले होते. शिवकालीन पारंपरिक वेशभूषेतील शिवप्रेमी, वाऱ्यावर फडकणारे भगवे ध्वज, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष, ढोल, ताशे, तुतारीचे स्वर यांनी संपूर्ण आसमंत दुमदुमून गेला होता.

गडावर मंगलमय वातावरणात सकाळी ६ वाजता शिवराज्याभिषेकाच्या धार्मिक विधींना सुरुवात झाली. ब्रह्मवृंदाच्या मंत्रघोषात वेद उच्चारासोबत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा सिंहासनाधिष्टीत करण्यात आली. सिंहासनावर आरूढ झालेल्या महाराजांच्या प्रतिमेवर सुवर्ण नाण्यांचा अभिषेक करण्यात आला. हा क्षण उपस्थित शिवप्रेमींची उत्कंठा शिगेला नेणारा होता. या वेळी संपूर्ण गडावर एकच जल्लोष झाला. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषात संपूर्ण आसमंत दुमदुमुन गेला. ढोल ताशांच्या गजरात भगवे झेंडे, तलवारी, भाले आकाशाच्या दिशेने उंचावत शिवभक्तांनी आपला आनंद व्यक्त केला. या सोहळ्याची सांगता पालखी मिरवणुकीने करण्यात आली.

### शिवरायांच्या विचारांनी राज्याची वाटचाल -मुख्यमंत्री

आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. शिवरायांची ही संकल्पना पुढे नेत सुराज्य निर्माण केले जात आहे. महाराष्ट्र राज्य हे शिवरायांच्या विचारांवर वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन या वेळी केले. महाराष्ट्रातील गडकिल्ले जागतिक वारसा यादीमध्ये समाविष्ट होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

> **छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेची मनापासून काळजी घेतली. म्हणून महाराज खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. त्यांनी स्थापन केलेले राज्य हे लोककल्याणकारी होते. शेतकऱ्यांचे, गोरगरिबांचे, कष्टकऱ्यांचे नुकसान होईल असा निर्णय महाराजांनी घेतला नाही.**
>
> **-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

# पनवेलमध्ये वर्षासहलीला आलेले नऊ जण अडकले

## आदई येथील घटना; सुखरूप सुटका



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील आदई येथे वर्षासहलीसाठी आलेले नऊ महाविद्यालयीन विद्यार्थी खाली उतरताना वाटेत अडकले होते. त्यांना खांदेश्वर पोलिसांसह अग्निशमन दलाच्या जवानांनी वाचविले आहे.

मुंबई परिसरातील साधारण १८ ते २० वयोगटातील आठ मुली आणि एका मुलगा असे नऊ महाविद्यालयीन विद्यार्थी गुरुवारी (दि. २०) सकाळी पनवेल-माथेरान रस्त्यावरील आदई गावाजवळ असलेल्या धबधब्यावर वर्षासहलीचा आनंद लुटण्यासाठी आले होते. तेथून खाली उतरताना हे विद्यार्थी मार्ग निसटता असल्याने अडकले होते. या वेळी आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी या तरुणाईचा जीव धोक्यात असल्याचे पाहून तत्काळ अग्निशमन दल व खांदेश्वर पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानुसार पथके आली आणि त्यांनी या नऊ जणांना रेस्क्यू करून डोंगरावरून सुखरूप खाली उतरवले, तेव्हा सर्वांचा जीव भांड्यात पडला.

यामध्ये साक्षी चेतन दर्जी, युक्ती धर्मेंद्र पटेल, हेमंत केतन शर्मा, लय प्रशांत गोपर (सर्व रा. भाईंदर) आदींचा समावेश होता. याचदरम्यान कोन इंडिया बुल्स येथीलदेखील काही तरुण-तरुणी डोंगर परिसरात गेले होते. त्यांनादेखील खाली आणण्यात आले.

या वेळी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे नाईक प्रकाश ओंबासे यांच्यासह अग्निशामक दलाचे प्रशांत दरेकर, वैभव खंडागळे, नवनाथ आंधळे, संतोष पडचाळ, भूषण पाटील, योगेश शिंदे, दिग्विजय धुमाळ यांनी रेस्क्यूत योगदान दिले.

### पोलिसांचे आवाहन

वर्षासहलीसाठी येताना तरुणाईने संबंधित भागातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून यावे तसेच या संदर्भातील माहिती आपल्या कुटुंबियांना, महाविद्यालयाला द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वर्षाकालीन पर्यटनस्थळांवर दक्षता

**पनवेल :** पावसाळा सुरू झाल्याने वर्षासहलीसाठी मोठ्या प्रमाणात मुंबई, नवी मुंबई व उपनगरांतून नागरिक पनवेल परिसरात येत असतात, परंतु येथील वातावरण व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज त्यांना येत नसल्याने अनेकांचे नाहक जीव जातात. तसे होऊ नये यासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांनी विविध ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन करणारे फलक उभारले आहेत. नदीपात्रात बुडून मृत्यू होण्याच्या बऱ्याच दुर्घटना झालेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांनी त्याबाबत दक्षता घ्यावी. लहान मुले, स्त्रिया व ज्या लोकांना पोहता येत नाही त्यांनी पाण्यात उतरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. **(सविस्तर वृत्त पान ३ वर..)**

## निवडक

### हज यात्रेत उष्माघाताने एक हजारहून अधिक जणांचा मृत्यू

**मक्का :** सौदी अरेबियातील मक्का येथे हज यात्रा सध्या सुरू आहे. या यात्रेमध्ये तब्बल एक हजार भाविकांना उष्माघाताने जीव गमवावा लागला आहे. सध्या सौदी अरबसह मध्य पूर्व आशियात उष्णतेची लाट पसरली आहे. त्यामुळे तब्बल ५५० हज यात्रेकरूंचा बुधवारी उष्माघाताने मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता या मृतांच्या संख्येत वाढ झाली असून ही संख्या एक हजारावर पोहचली आहे, तर अनेकांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### तामिळनाडूत विषारी दारू प्यायल्याने २९ जणांचा मृत्यू

**चेन्नई :** तामिळनाडूच्या कल्लाकुरीची जिल्ह्यात बुधवारी एका रात्रीत २९ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विषारी दारू प्यायल्याने हा प्रकार घडला असल्याचा अंदाज जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. याशिवाय ७०हून अधिक व्यक्तींना रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे. काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे.

# राज्यात मोसमी पावसाची आगेकूच



**मुंबई : प्रतिनिधी**

मोसमी पावसाने राज्यात थोड्या कालावधीसाठी नाही, तर तब्बल दोन आठवड्याहून अधिक काळ विश्रांती घेतली होती. अखेर पावसाची ही विश्रांती आता संपली असून तो पुढे सरकला आहे. राज्यातील अनेक भागात पावसाचा जोर वाढला आहे. मुंबईतही पुन्हा पावसाने प्रवेश केला असून काही भागात दमदार पावसाने हजेरी लावली.

यंदा रोहिणी नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले, पण हवामान खात्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित ठेवल्या. हवामान खात्याने मृग नक्षत्रात दमदार पावसाचा अंदाज देण्यात आला, मात्र या नक्षत्राचा प्रवास संपण्याच्या वाटेवर असतानाही दमदार पाऊस झालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली. सुरुवातीच्या पावसावर आणि हवामान खात्याने दाखवलेल्या आशेमुळे काही शेतकऱ्यांनी पेरणी केली, मात्र पावसाने दिलेल्या हुलकावणीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली, तर काही ठिकाणी पाऊसच नसल्याने पेरण्यादेखील रखडल्या. सलग दोन आठवडे पावसाने दडी मारल्याने पेरणी करणारा आणि पेरणी न झालेला शेतकरी हतबल झाला. आभाळी वातावरणाने शेतकरीच नाही तर नागरिकांनाही पावसाचे वेध लागतात, पण पाऊस प्रत्येकवेळी पाठ फिरवत असल्याचे चित्र या दोन आठवड्यात तयार झाले होते.

दरम्यान, राज्यातील अनेक भागात गुरुवारपासून मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. राजधानी मुंबई ओलिचिंब झाली आहे. हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा, तर काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी कोसळतील, असा अंदाज व्यक्त केला आहे.

## 'नीट' : समुपदेशन रोखण्यास सुप्रीम कोर्टाचा पुन्हा नकार

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने नीट यूजी समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार दिला आहे. अंतिम सुनावणीनंतर परीक्षा रद्द झाल्यास समुपदेशनही रद्द करण्यात येईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यापूर्वी ११ जून रोजी सर्वोच्च न्यायालयाने हे अपील फेटाळले होते.

परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या नव्या याचिकेवर गुरुवारी (दि. २०) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. ४९ विद्यार्थी आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया यांनी ही याचिका दाखल केली आहे. यावर पुढील सुनावणी ८ जुलैला हाईल. याचिकाकर्त्यांनी परीक्षेत ६२०पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी व फॉरेन्सिक तपासणीची मागणी केली आहे. त्याचबरोबर पेपरफुटी आरोपाच्या सीबीआय चौकशीचीही मागणी आहे.

# पुण्यात रिल्सच्या नादात तरुणीचा जीवघेणा स्टंट

## टेरेसवरून तरुणाच्या हाताला लटकली



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात रिलसच्या नावाखाली जीवघेणा स्टंट केल्याचे धक्कादायक प्रकार समोर येऊ लागलेत. मागील आठवड्यात दुचाकीवरून एक तरुणी हात सोडून चालवतानाचा व्हिडीओ समोर आला असताना आता कात्रज भागातून पुन्हा एकदा जीवघेणा स्टंट व्हायरल झाला आहे. एका इमारतीच्या टेरेसवरून तरुणी ही तरुणाच्या हाताला खाली लटकली.

रिल्समध्ये एक हा त्या टेरेसवर झोपला असून त्याने त्याचा उजवा हात टेरेसवरून खाली सोडलेला दिसतोय. त्या हाताला तरुणी लटकत आहे, तर दुसरा तरुण शेजारी उभा राहून व्हिडीओ काढतोय. टेरेसवर चारही बाजूने कॅमेरे लावण्यात आल्याचेही रिल्समधून दिसत आहे. हे करीत असताना तरुणीचा हात निसटला असता अथवा तरुणाकडून वजन पेलले नसते, तर तरुणी नक्कीच खाली पडली असती. सुदैवाने अशी काही घटना घडली नाही, पण असा जीवघेणा स्टंट करण्यावरून समाजमाध्यमात मोठ्या प्रमाणावर टीका होत आहे. त्याचप्रमाणे अशा स्टंटबाबत कठोर कारवाईचे कायदे तयार करावेत, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून येत आहे.

# वाढवण बंदर उभारणीस मंजुरी दिल्याबद्दल केंद्राचे मानले आभार



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील वाढवण (जि. पालघर) बंदर उभारणी करण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची बाब असून यासाठी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे राज्याचे बंदरे विकासमंत्री संजय बनसोडे यांनी आभार मानले आहेत.

जगातील १० मोठ्या बंदरापैकी देशातील वाढवण हे एकमेव मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होणार आहेत. सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा मंत्री बनसोडे यांनी व्यक्त केली.

वाढवण बंदर हे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) व महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागिदारीतून होणार आहे. या बंदर प्रकल्पाची किंमत ७६ हजार २०० कोटी रुपये आहे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ व २६ टक्के आहे. वाढवण बंदराची उभारणी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही मंत्री बनसोडे यांनी सांगितले.

**'विकासाचे नवे दालन खुले होणार'**

वाढवण परिसरात राहणाऱ्या स्थानिक लोकांना, मत्स्यव्यवसाय करणारे व या व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांचे पुनर्वसन तसेच योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त कौशल्य विकास कार्यक्रम राबवून रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. वाढवण बंदरामुळे स्थानिक नागरिकांच्या आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार असल्याचे मंत्री बनसोडे यांनी म्हटले आहे.

# रायगडात भातलावणीच्या कामाला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

चार दिवसांच्या विश्रांतीनंतर रायगड जिल्ह्यात पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण असून शेतीच्या कामांना वेग आला आहे. जिल्ह्याच्या दक्षिण भागात भातपिकाच्या लावणीला सुरुवात झाली आहे.

यंदा अपेक्षेप्रमाणे पाऊस वेळेवर सुरू झाल्याने भातरोपांची पुरेशी वाढ झाली आहे. दक्षिण रायगडमध्ये शेतकऱ्यांनी आता भातलावणीला सुरुवात केली आहे. जमीन नांगरून चिखल करणे, रोपे खणून त्यांची लागवड करणे अशी कामे सुरू झाली आहेत. जिल्ह्यात यंदा ९८ हजार हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे उद्दिष्ट कृषी विभागाने ठेवले आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास लावणीची कामे वेळेत आटोपतील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



दक्षिण रायगडातील महाड, पोलादपूर, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन या भागात मे महिन्याच्या अखेरीस धूळवाफ्यावर भाताची पेरणी केली जाते. त्यामुळे पहिल्या पावसापासूनच भाताच्या दाण्याला रूजवा यायला सुरुवात होते. परिणामी भातरोपांची वाढ वेळीच होत असते. यंदा पाऊस दरवर्षीच्या तुलनेत लवकर सुरू झाला. त्यामुळे भातरोपांची वाढ वेळीच झाली. जिल्ह्यात बुधवारी संध्याकाळपासून पावसाने पुन्हा जोर धरल्याने महाड तालुक्यातील रायगड खोऱ्यात शेतकऱ्यांनी भाताची लागवड सुरू केली आहे. बैलाच्या पारंपरिक नांगराचा वापर लावणीच्या वेळी आजही केला जात आहे. पावसाचे सातत्य राहिले, तर तो भातरोपांच्या वाढीला पोषक ठरणार असून जिल्ह्याच्या इतर भागातही लवकरच भातलावणीच्या कामाला सुरुवात होईल, असा अंदाज आहे.

### पावसाचा जोर वाढला

*मागील काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने बुधवार संध्याकाळपासून पुन्हा बरसायला सुरुवात केली. बुधवारी अधूनमधून पावसाच्या सरी बरसत होत्या, तर गुरुवारी सकाळपासून पावसाचा जोर वाढला असून अधूनमधून जोरदार सरी कोसळत आहेत. या पावसाने हवेतील गारवा वाढला आहे. पावसामुळे कुठेही आपत्तीजनक परिस्थिती ओढवली नाही किंवा जीवित व वित्त हानी झाल्याचे वृत्त नाही. जिल्ह्यात गुरुवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत ५०.९६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. कर्जतमध्ये सर्वाधिक १०८ मिलीमीटर पाऊस पडला. यंदाच्या मोसमात आजपर्यंत सरासरी २५२.४५ मिलीमीटर इतका पाऊस झाला आहे.*

# सकाळी नऊपूर्वी भरणाऱ्या शाळांना नोटीस

## आदेशाचे उल्लंघन केल्यास होणार कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

शिक्षणाधिकाऱ्यांच्या परवानगीविना सकाळी ९ वा. पूर्वी भरणाऱ्या शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाणार आहे. अनेक शाळा नियम करूनही सकाळी ९ वा. पूर्वी शाळा भरवत असल्याने शिक्षण विभागाने हे पाऊल उचलले आहे.



राज्यात यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व माध्यमांच्या चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वा. नंतर भरवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला, मात्र अनेक शाळांनी या निर्णयाचे पालन केलेले नाही. शाळा सकाळी लवकर भरत असल्यास विद्यार्थ्यांची झोप पूर्ण होत नसल्याचा मुद्दा मांडून राज्यपाल रमेश बैस यांनी शाळेची वेळ बदलण्याची सूचना केली होती. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९नंतर भरवण्याबाबत काही महिन्यांपूर्वी शासन निर्णय प्रसिद्ध केला.

या निर्णयाची शैक्षणिक वर्ष २०२४-२५पासून अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, मात्र या निर्णयावरून बराच वादविवाद झाला. या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत अनेक तांत्रिक मुद्देही उपस्थित करण्यात आले.

विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसचालकांनीही या निर्णयाला विरोध केला होता. शैक्षणिक वर्ष सुरू होताना काही शाळांनी वेळेत बदल केला आहे, तर काही शाळांनी पालकांशी चर्चा करून वेळ ठरवली. काही शाळांनी मात्र या निर्णयाचे पालन केलेले नाही. त्यामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

या पार्श्वभूमीवर, शिक्षण विभागाच्या दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत इतर विषयांबरोबरच शाळेच्या वेळेच्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतही चर्चा झाली. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी म्हणाले, राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या चौथीपर्यंतच्या शाळा शासनाच्या निर्णयानुसार सकाळी ९नंतरच भरवणे आवश्यक आहे.

सकाळी ९ वा.पूर्वी शाळा भरवायची असल्यास संबंधित शाळांनी सबळ कारण देऊन शिक्षणाधिकाऱ्यांची रितसर परवानगी घेतली पाहिजे. त्यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील शाळांच्या वेळेची माहिती घेण्याच्या, तसेच परवानगी न घेता सकाळी ९पूर्वी भरणाऱ्या शाळांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या आदेशाचे पालन योग्यरितीने होणे आवश्यक आहे. तसे होत नसल्याचे निदर्शनास आल्यास शिक्षणाधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाणार आहे.

### रोहा सारसोली सुरुंग स्फोट प्रकरण

## फरार आरोपींना अटक; चार दिवसांची पोलीस कोठडी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सारसोली गावालगत ओहळाचे कातळ फोडण्यासाठी सुरुंग लावून कोणत्याही प्रकारची खबरदारी न घेतल्याने झालेल्या स्फोटात एका १० वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एक आठ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना १४ जून रोजी घडली होती. या दुर्घटनेनंतर रोहा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेतील फरार आरोपींचा रोहा पोलिसांनी शोध लावण्यात यश आले असून आरोपींना गुरुवारी (दि.२०) अलिबाग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

चणेरा भागातील सारसोली गावात १४ जून रोजी सुरुंग स्फोट होऊन खंदार आदिवाडी येथील सुभाष रमेश पवार (वय १०) या मुलाचा मृत्यू झाला, तर आर्यन संजय जाधव (वय ८) हा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर मंगेश गणेश पवार (रा. खंदार आदिवासीवाडी-चणेरा) याने रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. जमीनमालक दत्ताराम कृष्णा चाळके व अन्य अज्ञात व्यक्तीविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेतील अन्य दोन आरोपी फरार झाल्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवत आरोपी सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील फडकेवाडी या गावात असल्याची माहिती रोहा पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून दत्तात्रय जयसिंग यादव व सुभाष लक्ष्मण चव्हाण यांना सोमवारी (दि.१७) अटक केली आहे.

या दोन्ही आरोपींना गुरुवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना चार दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद वायंगणकर करीत आहेत.

## नवखार येथे घराकडे जाणारी वाट केली बंद; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

घराकडे जाणारी पाऊलवाट बंद केल्याने रेवदंडा पोलिसांनी नवखार येथील एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलिबाग तालुक्यातील सुडकोली हद्दीतील नवखार येथील फिर्यादींनी १९९६ साली गंगाराम चांगू भगत गट यांनी क्र.८मधील हिश्श्याची जमीन साठेकराराद्वारे विकत घेतली होती व तेथे १९९६-९७मध्ये घर बांधले होते. येथून जाणे-येण्याकरीता पाउलवाट होती, परंतु आरोपींनी पाउलवाटेवर बांधकाम करून पाऊलवाट कायमची बंद करून फिर्यादींना घराकडे जाण्यास मज्ज्ञाव केला, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

## हिंजवडी आयटी पार्क होणार वाहतूक कोंडीमुक्त

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिल्या सूचना

**पुणे : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्र अशी ओळख असणाऱ्या हिंजवडीतील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासह या परिसरात नवीन उद्योगांसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यासारख्या पायाभूत सुविधा पूर्ण कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि.१९) वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंजवडी औद्योगिक संघटनेच्या मागण्यांबाबत बैठक घेतली. ते म्हणाले की, हिंजवडी, माण, मारुंजी गावच्या हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून तीन टप्प्यांमध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यात आले आहे. येथील कंपन्यांना पूरक वातावरण देण्यास राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांनी उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे समन्वयाने आणि तातडीने निराकरण करावे. उद्योग, नोकरीनिमित्त हिंजवडीत येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत याठिकाणचे रस्ते अरूंद असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

हिंजवडीतील रस्ते रुंद करावेत, सर्वच रस्त्यांवर सहा मार्गिका ठेवाव्यात, आवश्यक ठिकाणी उड्डाणपूल उभारावेत, सेवा रस्त्यांची रुंदी वाढवावी, रस्त्यांवरील खड्डे भरावेत, दुभाजक आणि पदपथांच्या दुरुस्तीची कामे तत्काळ मार्गी लावावीत, पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था उभारावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## मुंबईत स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून अधूनमधून पडणारा पाऊस, ढगाळ वातावरण, मध्येच पडणारे कडक ऊन यामुळे साथीच्या आजारांचा प्रादूर्भाव वाढू लागला आहे. मुंबईत सध्या स्वाईन फ्लूच्या रुग्णांच्या संख्याही वाढत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

पावसाळा सुरू झाला की हिवताप, डेंग्यू, स्वाईन फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होते. मागील आठवडाभरापासून मुंबईमध्ये अधूनमधून पाऊस पडत असला तरी वातावरणातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. अनेक वेळा सकाळी ढगाळ वातावरण, तर दुपारी कडक ऊन पडते. वातावरणातील या बदलाचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. मुंबईकर सर्दी, तापाने हैराण झाले आहेत. या रुग्णांची हिवताप, डेंग्यू आणि स्वाईन फ्लूची तपासणी करण्यात येत आहे. बदलत्या वातावरणामुळे मुंबईमध्ये स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर साथीच्या आजारांमध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या रुग्णांची तपासणी केल्यानंतर स्वाईन फ्लूचे काही रुग्ण आढळले असल्याचे सेंट जॉर्जेस रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनायक सावर्डेकर यांनी सांगितले.

## पेणमध्ये गुन्हेगारातील माणूस उलगडून दाखवणारी मुलाखत

**पेण : प्रतिनिधी**

पोलीस अधिकाऱ्याने लिहिलेले 'पोलीस मन' आणि छायाचित्रकाराने लिहिलेले 'शूटआउट' या दोन्ही पुस्तकांतून सतत विचलित करणाऱ्या घटनांनी मनावर स्वतःच पांघरूण घालून पुढे चालत राहणे आणि त्याच उमेदीने काम करीत आपले माणूसपण जपणे या बाबी स्पष्ट होतात.

पेण येथील महात्मा गांधी मंदिर वाचनालय, मराठी साहित्य मंडळ व अहिल्या महिला मंडळाकडून पोलीस मन हे पुस्तक लिहिणारे निवृत्त अप्पर पोलीस उपायुक्त अजित देशमुख आणि शूटआउट हे पुस्तक लिहिणारे घनश्याम भडेकर यांची मुलाखत काही दिवसांपूर्वी आयोजित करण्यात आली होती.

या दोन्ही पुस्तकांमधील अनुभवांवर आधारित हा मुलाखतीचा कार्यक्रम होता. विनायक गोखले व प्रसिद्ध मूर्तिकार श्रीकांत देवधर यांनी या वेळी मुलाखत घेतली. पोलीस मन उलगडून दाखविणारे अजित देशमुख आणि शूटआउट लिहिणारे घनश्याम भडेकर यांचा या वेळी सत्कारही करण्यात आला.

पोलीस म्हटले की, एक वेगळे व्यक्तिमत्व डोळ्यासमोर येते, जरब दाखवणारा, हुकूमत गाजवणारा, करूणेचा स्पर्श नसलेला, मात्र अजित देशमुख यांचे पोलीस मन हे पुस्तक वाचल्यावर मात्र या साऱ्या भावनांचा छेद मिळतो. नोकरीच्या कालावधीत घडलेल्या काही गुन्ह्याच्या तपासणीमध्ये जे अनुभवले, त्या सर्वांचा लेखाजोखा या पुस्तकांत आहे, असे त्यांनी सांगितले.

## ग्रामीण स्तरावरूनच शिक्षण व्यवस्थेचे सक्षमीकरण होणे गरजेचे -दिलीप भोईर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अंगणवाडीमधील मुलांवर ग्रामीण स्तरावरूनच शिक्षणसंस्कार व्हायला हवेत. त्याकरिता शाळागृहे अद्ययावत असायला हवीत. आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देतांना वातावरण निरोगी आणि प्रसन्न राहील, याकडेही लक्ष्य देणे आवश्यक आहे. शासनासोबतच समाजघटक म्हणून आपणही आपली जबाबदारी पार पाडायला हवी, असे मत भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी व्यक्त केले.



रायगड जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ मधून साकारलेल्या ग्रामपंचायत श्रीगाव येथील देहेन विभागातील नवीन अंगणवाडीचे उद्घाटन दक्षिण रायगड जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष तथा माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष आणि ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष समीर राणे, अलिबाग तालुका चिटणीस अमित पाटील, भाजप जिल्हा चिटणीस परशुराम म्हात्रे, भाजप कार्यकर्ते राजेश पाटील, चेतन पाटील, निलेश पाटील, विक्रम पाटील, प्रहार संघटनेचे कोकण प्रदेश प्रमुख सचिन साळुंके व सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, माजी सैनिक संतोष जुईकर, पेरकर मॅडम, विद्यार्थी आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## माथेरानकरांसह पर्यटकांचा प्रवास खड्ड्यांतून

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमधील मुख्य प्रवेशद्वारापासूनच येणाऱ्या पर्यटकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यातच मुख्य रस्त्यावरील नव्याने लावण्यात आलेल्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे पादचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

उन्हाळयात हे खड्डे बुजविण्यासाठी काही संघटनांनी पुढाकार घेतला होता, परंतु याबाबत शासनाने चांगल्या दर्जाचे रस्ते बनविण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. याच रस्त्यावरून पर्यटक, शालेय विद्यार्थी त्याचप्रमाणे घोडे, ई-रिक्षा जात असतात.

> **सुप्रीम कोर्टाने नवीन क्ले ब्लॉक्सच्या कामाला स्थगिती दिली आहे, मात्र ब्लॉक्सच्या दुरूस्तीला नाही. पालिकेने तत्काळ क्ले ब्लॉक्सची दुरूस्ती करणे आवश्यक आहे कारण रस्त्यावरील खड्डेमय पाण्यात चालताना अंदाज येत नाही. पाय मुरगळतो. त्यामुळे पादचाऱ्यांस धोकादायक आहे**
>
> **-सुनील शिंदे,** सामाजिक कार्यकर्ते

> **प्रशासनाने चारही बाजूला फिरून बघितले तर माथेरान हे समस्याच्या फेऱ्यामध्ये अडकलेले आहे. त्यामध्ये मुख्य रस्त्याचे हे खड्डे जीवघेणे झालेले आहेत. याच खड्ड्यात पाय अडकून अनेक पर्यटकांना, घोड्यांना दुखापत झाली आहे. ही बाब अनेक वेळा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असतानाही प्रशासन याबाबत विचार करीत नाही.**
>
> **-राकेश कोकळे, अश्वपालक**

या खड्ड्यांमुळे अनेक पर्यटकांना दुखापत झाली आहे.

याबाबत संबंधित प्रशासनाने ठोस उपाययोजना करून सर्वांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे स्थानिक बोलत आहेत.



## मध्य रेल्वेच्या वातानुकूलित टास्क फोर्सची उत्तम कामगिरी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने प्रवाशांना चांगला अनुभव मिळण्यासाठी आणि उपनगरीय सेवांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सुरक्षितता आणि सोयी सुनिश्चित करण्यासाठी निर्णायक कारवाई केली आहे. वातानुकूलित, उच्च वर्ग टास्क फोर्स सुरू करून, या विभागाचे अनियमित प्रवासाला आळा घालणे आणि वातानुकूलित लोकल आणि प्रथम श्रेणी कोचमधील प्रवाशांचे मानक राखणे हे उद्दिष्ट आहे.




२५ मे रोजी हा उपक्रम सुरू झाल्यापासून, मध्य रेल्वेने उपनगरीय गाड्यांमधील अनियमित प्रवासाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक समर्पित वातानुकूलित/उच्च वर्ग टास्क फोर्स लागू केला आहे. (७२०८८१९९८७) या नव्याने सादर केलेल्या व्हॉट्सअॅप तक्रार क्रमांकाच्या मदतीने प्रवाशांच्या समस्यांना त्वरित प्रतिसाद देण्यासाठी १४ कर्मचारी सदस्यांचा समावेश असलेले एक विशेष पथक तैनात करण्यात आले आहे. या नावीन्यपूर्ण पद्धतीमुळे प्रवाशांना अनियमित प्रवासाच्या घटनांची तक्रार नोंदवता येते, गर्दीच्या वेळेत आणि त्यानंतरच्या काळात आवश्यकतेनुसार तत्काळ मदत मिळण्याची हमी मिळते.

मध्य रेल्वेने आपल्या उत्तम सेवेची अखंडता राखण्यासाठी घेतलेल्या सक्रिय भूमिकेचे कौतुक करणाऱ्या प्रवाशांकडून या उपक्रमाचे लक्षणीय कौतुक झाले आहे. १५ जूनपर्यंत, अनियमित प्रवासाची एकूण २,९७९ प्रकरणे हाताळण्यात आली आहेत, ज्यामुळे १०,०४,९८५ रू. इतका दंड आकारण्यात आला आहे. या सक्रिय अंमलबजावणीमुळे आधीच तक्रारींमध्ये लक्षणीय घट झाली आहे. दररोज १०० हून अधिक प्रकरणांवरून १५ जून रोजी फक्त सात प्रकरणे इतकी कमी झाली आहेत. उल्लेखनीय म्हणजे, मध्य रेल्वेचे मुंबई उपनगरीय नेटवर्क दररोज १८१० सेवांद्वारे दररोज अंदाजे ३३ लाख प्रवाशांची वाहतूक करते. दररोज अंदाजे ७८००० प्रवासी वाहतूक करणाऱ्या ६६ वातानुकूलित लोकल सेवांचा समावेश आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे उद्दिष्ट वातानुकूलित लोकल आणि प्रथम वर्ग डब्यातील अनियमित प्रवासाबाबत शून्य तक्रारी साध्य करण्याचे आहे. समर्पित व्हॉट्सअॅप तक्रार क्रमांक सादर केल्याने हे उद्दिष्ट साध्य करण्यात लक्षणीय मदत झाली आहे. प्रवाशांना (७२०८८१९९८७) या व्हॉट्सअॅप तक्रार क्रमांकाचा वापर करून अनियमित प्रवासाची कोणतीही घटना आढळल्यास तक्रार करण्यास प्रोत्साहित केले जात आहे. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी वचनबद्ध असून सतत नावीन्यपूर्ण आणि उच्च दर्जाचे सेवेचे पालन करत आहे.

## मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरात २७१ रुग्णांची तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत, ज्योविस आयुर्वेद हॉस्पिटल दादरव नारी सामाजिक संस्था दादर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री नवनाथ भक्त मंडळ पनवेल यांच्या सहकार्याने तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २७१ रुग्णांनी घेतला.



शिबिराचे उद्घाटन श्री नवनाथ भक्त मंडळाचे अरुण डांगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून तर डॉ. राज सातपुते आणि विजय पानसरे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या वेळी डॉ. ज्योती सातपुते, नंदकुमार मांढरे, संतोष कुंभार, प्रतिष्ठानचे खजिनदार विजय मांडे, सचिव मनीषा सुर्वे, विजय सातपुते, अजय सातपुते, वसंत ठाकूर आदी उपस्थित होते.

रुग्णांची तपासणी डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. यांनी रुग्णांची तपासणी करून औषधे दिली. श्री नवनाथ भक्त मंडळाचे खजिनदार विजय पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर झाले. एटीएसच्या पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी शिबिराला भेट दिली. मनीषा सुर्वे यांनी आभार मानले. राजीव समेळ, प्रसन्न खेडकर, वसुधा ठाकूर, शलाका नाईक, महेश क्षीरसागर, शलाका गरुड, वैशाली ठाकरे, नरेश जाधव, विशाल कांबळे, भूषण मांढरे आदी उपस्थित होते.

# पनवेलमधील वर्षा पर्यटनस्थळांवर दक्षता




पोलिसांकडून सुरक्षेच्या दृष्टीने फलक

**पनवेल : वार्ताहर**

नुकताच पावसाळा सुरू झाल्याने वर्षासहलीसाठी मोठ्या प्रमाणात मुंबई, नवी मुंबई व उपनगरे परिसरातून नागरिक येत असतात, परंतु येथील वातावरण व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज त्यांना येत नसल्याने अनेकांचे नाहक जीव जातात. यासाठी पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी विविध ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन करणारे फलक उभारले आहेत. काही त्यामध्ये प्रामुख्याने नदीपात्रात जाणे अत्यंत धोकादायक आहे, नदीपात्रामध्ये बऱ्याच ठिकाणी मोठे व खोल डोह आहेत.

माथेरान येथे पाऊस झाल्यास पाण्याचे प्रवाहामध्ये अचानक मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने काही लोकांचा यापूर्वी नदीपात्रात बुडून मृत्यू होऊन बऱ्याच दुर्घटना झालेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांनी त्याबाबत दक्षता घ्यावी, लहान मुले, स्त्रिया व ज्या लोकांना पोहता येत नाही, त्यांनी पाण्यात उतरू नये. गाढेश्वर धरणातून पनवेल शहरास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असतो, त्यामुळे नदीपात्रात उतरून अगर कोणतेही पदार्थ अथवा वस्तू टाकून पाणी दूषित करू नये, परिसरात अमली पदार्थ, दारू आणण्यास व पिण्यास मनाई आहे व या परिसरात अमली पदार्थ, असे आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. हा परिसर डोंगरळ असून रस्ते अरूंद आहेत. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास अग्निशमन वाहने, ॲम्ब्युलन्स यांना जाण्या-येण्यासाठी रस्ता खुला रहावा, यासाठी रहदारीस अडथळा निर्माण होईल, अशा तऱ्हेने वाहने उभी करू नयेत.

परिसरात वर्षासहलीसाठी येणारे पर्यटकांनी वाहनांचा वेग मर्यादित ठेवावा, तसेच नशा करून वाहने चालवू नये. पावसाळी पर्यटकांना गाढेश्वर धरण, वारदोली धबधबा, मोर्बे धरण, कुंडी धबधबा, हरिग्राम नदीपात्र, धोदाणी नदीपात्र, चिंध्रण व मोहोदर नदीपात्र, शांतीवन नदीपात्र, माची प्रबळ या ठिकाणी भेटी देण्यास मनाई आदेश काढण्यात आल्याची माहिती वपोनि अनिल पाटील यांनी या फलकाद्वारे दिली आहे.

याचप्रमाणे कोणी सूचनांचे उल्लंघन करताना आढळल्यास तत्काळ पनवेल तालुका पोलीस ठाणे (१९६७९१०००/०२२२७४५२४४४) तसेच डायल ११२ यावर संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहनसुद्धा करण्यात आले आहे.

## निवडक

### उरणमध्ये जमीन सुपिकता जागृती दिन



**उरण** : चाणजे हद्दीतील दाउर नगर येथील श्री वाघोबादेव मंदिर येथे बुधवारी (दि.१९) जमीन सुपिकता जागृती दिन साजरा करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त कृषी संजीवानी मोहीम पंधरावाडा कार्यक्रमांतर्गत जमीन सुपिकता जागृती दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रम उरण तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. या वेळी नागाव कृषी पर्यवेक्षक ए. डी. बुरकुल यांनी, कृषी विभागाच्या योजनांबाबत शेतकरी महिला वर्गाला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन चाणजे कृषी सहाय्यक आदिका पानसरे यांनी केले. शेतकऱ्यांना परसबाग भाजीपाला बियाणे किट वाटप करण्यात आले.

### कळंबोली वसाहतीमध्ये पाणी तुंबले

**पनवेल** : कळंबोली परिसरात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याचे प्रकार घडले. यामुळे वाहतूक कोंडीसुद्धा झाली आहे. पावसाचा जोर वाढला असून गुरुवारी पहाटेपासून पनवेल परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे अनेक सखल भागामध्ये पाणी साचले आहे. कळंबोली वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असल्याने पाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे. यातून मार्ग काढताना वाहनचालकांसह आबालवृद्धांना चांगला त्रास होत आहे, तर काहींनी पावसात भिजण्याचा आनंदसुद्धा लुटला आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल** : मुस्लीम मेट्रो मोनियल साईटवरून एका महिलेशी ओळख करून आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरूद्ध तिच्या संमतीविना पनवेल व डोंबिवली परिसरात दोन वेळा शारीरिक संबंध करून लग्न करण्यास नकार दिला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, या महिलेने याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आरोपी मोहम्मद शादाब मुनाफ अन्सारी (३१) याने ३० वर्षीय महिलेशी मुस्लीम मेट्रो मोनियल साईटवरून एका महिलेशी ओळख करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या संमतीविना लॉजवर नेऊन तिच्याशी वेळा शारीरिक संबंध करून लग्न करण्यास नकार दिला. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, महिलेने याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# करंजाडे ते पनवेल स्टेशन मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करा

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीपासून पनवेल रेल्वेस्थानकाला जोडणारी नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रम सेवेची ७६ क्रमांकाच्या बससेवेला वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले आहे. या बसच्या मार्गात सर्वांत मोठी वाहतूक कोंडी उरणनाका चौक आणि स्थानक परिसरात बस निघण्यासाठी तीन आसनी रिक्षांमुळे प्रवाशांना अनेक मिनिटांचा विलंब प्रवास करावा लागत आहे.

करंजाडे वसाहतीमधून एनएमएमटीच्या क्र. ७६ बसला पनवेल स्थानकामध्ये पोहोचण्यासाठी अर्धा तासांचा विलंब होत आहे. उरणनाका येथील मासळी बाजारामुळे उरण नाका येथे वाहतूक कोंडी झाली होती. पनवेल शहर वाहतूक पोलिसांच्या माहितीनुसार, या दोन्ही ठिकाणी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस कर्मचारी तैनात केले आहेत, तरीदेखील वाहतूक कोंडी होतेच कशी? असा प्रश्न विचारला जात आहे.

**वाहतूक पोलीस विभागाने उरणनाका येथील वाहतूक नियमनासाठी कर्मचारी तैनात केले आहेत, तसेच पनवेल रेल्वेस्थानक परिसरात तीनआसनी रिक्षांनी चुकीच्या पद्धतीने रिक्षा उभी केल्याने काही रिक्षांवर दंडात्मक कारवाई केली असून पोलिसांचे कारवाईत सातत्य सुरूच आहे.**
**-संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक विभाग**

### दुचाकीच्या धडकेने एकाचा मृत्यू

**मोहोपाडा** : भरधाव वेगातील दुचाकीवरील चालकाने रस्ता ओलांडणाऱ्या चार जणांपैकी एकाला धडक दिल्याने त्या व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पोयंजे हद्दीतील रस्त्यावर घडली आहे.

धिरज भुया (४० रा. ठोंबरेवाडी) व त्यांचे इतर तीन साथीदार असे जुना पुणे-मुंबई महामार्ग ओलांडताना दुचाकीवरून आलेला शिवशंकर मंडल याने भरधाव वेगाने दुचाकी चालवून धीरज भुया यांना धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# पनवेल परिसरात पावसाची संततधार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात गुरुवारी (दि.२०) सकाळपासून पावसाची संततधार सुरू झाली आहे. यानंतर मात्र वीज व्यवस्था कोलमडली. ग्रामीण पनवेलसह कळंबोली, कामोठे परिसरातील अनेक ठिकाणी वीज गायब झाली.

गुरुवारी सकाळपासून पावसाने जोरदार सुरुवात केली. कामावर जाणाऱ्या नोकरदारवर्गाची त्यामुळे धावपळ झाल्याचे चित्र होते. पावसाची सकाळपासून सुरुवात झाल्यावर अचानक वीजपुरवठा खंडित झाला. कामोठे वसाहतीमध्येसुद्धा वीज गायब झाली. पनवेलच्या ग्रामीण भागात वीज गायब होणे ही नित्याचे असल्याने येथील वीज ग्राहकांना वीजपुरवठा खंडित होण्याचा सामना करावा लागला.

अखंडित वीजपुरवठ्यासाठी दर आठवड्यातील एक दिवस काही तास दुरूस्तीच्या कामासाठी वीज महावितरण कंपनी वीजपुरवठा बंद ठेऊन दुरूस्तीची कामे हाती घेते. पावसाळ्यापूर्वीसुद्धा याच पद्धतीने झाडांच्या छाटणीसाठी वीजपुरवठा बंद ठेऊन कामे केली जातात. तरीही विजेचा लपंडाव पावसाळ्यात सुरूच असल्याने नागरिक हैराण झाले होते.

# वटपौर्णिमा साहित्य खरेदीसाठी महिलांची लगबग



**उरण : प्रतिनिधी**

वटपौर्णिमा शुक्रवारी (दि.२१) असल्याने उरण बाजारात पूजा साहित्याच्या खरेदीसाठी महिलांची लगबग सर्वत्र दिसत आहे.

वटपौर्णिमेच्या दिवशी महिलावर्ग वटवृक्षाची मनोभावे पूजा करून वृक्षास सात फेरे घालून सात जन्मी हाच पती मिळावा अशी प्रार्थना करीत असतात. वटवृक्षाची पूजा करताना फणसाच्या गऱ्यांना विशेष महत्त्व आहे. बाजारात अख्खे फणस ४० रुपये किलो तर गरे ५० रुपयांस पाव किलो या दराने विकले जात आहेत.

पुजेसाठी लागणारी फळे महाग झाले आहे. जांभळे १०० रुपये पाव किलो, करवंदे २० रुपये वाटा, केळी ६० रुपये डझन, करंडा फणी १० रुपये, मोसंबी व संत्री ५० रुपयांस चार नाग, सफरचंद २०० रुपये किलो, डाळींब २०० रुपये किलो या दराने आम्ही विकतो, असे फळविक्रेता सैपन पटेल यांनी सांगितले.

# खांदेश्वर येथून तरुण बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

हॉस्पिटलमध्ये जाऊन येतो असे सांगून घराबाहेर पडलेला तरूण न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रामनाथ सुदाम मेंदारकर (३८) हा स्वामी दर्शन बिल्डींग, देवद येथे राहण्यास असून तो हॉस्पिटलमध्ये जाऊन येतो, असे सांगून घराबाहेर पडला तो अद्याप न परतल्याने तो हरविल्याची तक्रार त्याचा भाऊ दिलीप मेंदारकर यांनी दिली आहे. बेपत्ता रामनाथ याची उंची पाच फुट, रंग गोरा, अंगाने मध्यम असून सफेद चौकडी शर्ट, निळ्या रंगाची जिन्स, दाढी साधारण वाढलेली पायात चाकलेटी रंगाची सॅण्डल, सोबत ओपो कंपनीचा मोबाईल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.



# मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धेत अनिल दाभाडे तृतीय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वर्ल्ड व्हिजन संस्था मुंबई या संस्थेने राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत रसायनीतील अनिल दाभाडे यांना मानाचा तृतीय पुरस्कार लाभला.

या राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा नुकताच प्रदर्शित झालेला जुने फर्निचर या मराठी चित्रपटाचे परिक्षण करून त्यावर समीक्षा लेख लिहून अनिल दाभाडे यांनी या स्पर्धेत पाठविला होता. चित्रपटाचे कथानक, आशय आणि चित्रपटाच्या माध्यमातून मिळणारा सामाजिक बोध यावर उत्तम भाष्य केले आहे. त्या लेखाला राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धा २०२४चा सन्मानाचा तृतीय पुरस्कार लाभला.

ज्येष्ठ साहित्यिक, कवी, लेखक तथा चारोळीकार अनिल दाभाडे यांना मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**पनवेल : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१वा शिवराज्याभिषेक सोहळा सर्वत्र मोठ्या उत्साहात गुरुवारी साजरा झाला. यानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

# साई येथील विद्यालयात शैक्षणिक साहित्यवाटप

**उरण : प्रतिनिधी**

शुभदा पॉलीमर्स प्रॉडक्स प्रा.लि.व प्रमोद झवेरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीस्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सार्वजनिक विद्यामंदिर साई येथील विद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या ओळखून शुभदा पॉलीमर्स प्रॉडक्ट्स प्रा. लि. च्या संचालक फाल्गुनी झवेरी यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला वह्या, कपडे व खाऊवाटप केले. सर्व शिक्षकांना बहुउपयोगी ब्लूटूथ स्पीकर देऊन सन्मानित केले. या उपक्रमामुळे विद्यालयातील ३५० ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे.

कार्यक्रमासाठी शुभदा जुगल ज्वेलर्सचे गुजल शाह, जिनल शाह, स्थानिक सल्लागार कमिटीचे चेअरमन दामोदर मोकल, पालक प्रतिनिधी सचिन मोरे आदी उपस्थित होते.

# वाढवण येथे होणार ग्रीनफिल्ड डीप ड्राफ्ट प्रमुख बंदर




**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली जवाहरलाल नेहरूंनी स्थापन करण्यात आलेल्या वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडद्वारे डहाणूजवळ वाढवण येथे मोठे बंदर उभारण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड यांचा अनुक्रमे ७४ टक्के आणि २६ टक्के हिस्सा आहे. वाढवण बंदर हे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील ग्रीनफिल्ड डीप ड्राफ्ट प्रमुख बंदर म्हणून 'लँड लॉर्ड' मॉडेलवर विकसित केले जाणार आहे.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी, जनेपप्रा आणि एमएमबीच्या एसपीवीद्वारे वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडद्वारे प्रकल्प राबविण्यात येईल, असे म्हटले. बंदर वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि बंदर जहाज व जलमार्ग मंत्रालयाचे मानद सचिव टी. के.रामचंद्रन यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शन लाभल्याने आम्ही मनापासून कृतज्ञ असल्याचेही उन्मेष वाघ म्हणाले.

भूसंपादनाच्या घटकासह एकूण प्रकल्पाची किंमत ७६,२२० कोटी आहे. यामध्ये पीपीपी मोडमधील मुख्य पायाभूत सुविधा, टर्मिनल आणि इतर व्यावसायिक पायाभूत सुविधांचा समावेश असेल. बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी १००० मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल, चार बहुउद्देशीय बर्थ, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे.

या प्रकल्पामध्ये ऑफशोअर क्षेत्रात १,४४८ हेक्टर क्षेत्र पुनर्सचयित करणे आणि १०.१४ किमी ब्रेकवॉटर, कंटेनर, कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे.

मंत्रिमंडळाने बंदर आणि राष्ट्रीय महामार्गांदरम्यान एमओआरटीएचद्वारे रस्ते कनेक्टिव्हिटी स्थापित करण्यास आणि विद्यमान रेल्वे नेटवर्कशी रेल्वेजोडणी आणि एमओआरद्वारे आगामी समर्पित रेल फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी दिली.

# पनवेल येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि रेल्वेस्टेशन पोलीस जीआरपी यांच्या संयुक्त विद्यामाने पनवेल स्टेशन येथे मोफत डोळे तपासणी शिबिर शुक्रवारी (दि.२१) आयोजित केले आहे. शिबिरामध्ये अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मे देण्यात येणार आहेत. पनवेल परिसरातील गरजू व गरीब नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिर सकाळी १० ते ४ या वेळेत सुरू राहणार आहे. यासाठी शेख, रेल्वे पोलीस अमर पाटील रेल्वे पोलीस, प्रशांत गायकवाड (९००४२३३४२६), विनोद पाचघरे (९५९४९८६८१८) यांच्याशी संपर्क साधावा.

# मधुबन कट्ट्यावर कविसंमेलन



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पावसाची आतुरता हा विषय घेऊन मधुबन कट्ट्यावर झालेल्या १०४व्या कविसंमेलनात ज्येष्ठ नागरिकांना काव्यरूपी पाऊसधारा अनुभवायला मिळाल्या. कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणतर्फे विमला तलाव उरण शहर येथील मधुबन कट्ट्यावर माणिक पाटील यांचे अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले.

या कविसंमेलनात अनुज शिवकर, दौलत पाटील, हेमंत पाटील, संजय होळकर, मारूती तांबे, रामचंद्र म्हात्रे, अजय शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे, प्रा. साहेबराव ओहळ, नरेश पाटील प्रा. एल. बी. पाटील आदी कवींनी आतुरता पावसाची या विषयावर आपल्या कविता सादर केल्या.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यात योगदान देणाऱ्या उरणमधील प्रतिष्ठित नागरिकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

ऑक्सिजन पार्क तयार करून पर्यावरणाविषयी जनजागृती करणारे पर्यावरण मित्र सारडेचे नागेंद्र परशुराम म्हात्रे, कीर्तन व अध्यात्मिक सेवेतून प्रबोधन करणारे नारायण तांडेल आणि मेल फिमेल व्हाईस सिंगर म्हणून मिहेन फुंडेकर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास प्रा. एल. बी. पाटील, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष श्रीरामचंद्र म्हात्रे, पत्रकार घनशाम कडू, विठ्ठल ममताबादे, राधा बीस्ट, अनिता शिवकर, नरेश पाटील, दत्ताराम निलवर्ण, सुरेश भोईर, तानाजी गायकवाड, अनंत पाटील, भिकाजी गायकवाड आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# नेहमीचे रडगाणे!

विधानसभेच्या निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. त्या दृष्टीने सर्वच पक्षांनी आपापली मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेनेचे दोन्ही गटही त्याला अपवाद नाहीत. एका अर्थी विधानसभा निवडणुकीच्या रणांगणाच्या तुताऱ्याच बुधवारच्या दोन्ही वर्धापन दिनाच्या मेळाव्यांमध्ये वाजल्या असे मानायला हरकत नाही.

**शिवसेनेचा ५८ वा वर्धापन दिन वरळीच्या डोममध्ये थाटामाटात साजरा झाला. या मेळाव्याला शिवसैनिकांची जी गर्दी जमली होती, ती पाहून असली कोण आणि नकली कोण याचे उत्तर महाराष्ट्राच्या जनतेला मिळाले असेल. शिवसेना या अखंड पक्षात अडीचेक वर्षापूर्वी अभूतपूर्व फूट पडली. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दावणीला नेऊन आपली संघटना बांधणाऱ्या उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेतील या फुटाफुटीची चर्चा यापुढेही होत राहणार. सत्तेच्या लोभापायी काँग्रेसच्या गोटात सामील झालेल्या ठाकरे यांनी आपल्याच पक्षातील लढाऊ आणि निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भावनेची पर्वा न केल्याने जे व्हायचे तेच झाले. शिवसेनेचे लढाऊ नेते एकनाथ शिंदे यांनी उठाव करुन ठाकरे यांचा डाव हाणून पाडला. मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी एकजुटीने शिंदे यांच्यासोबत आलेल्या शिवसैनिकांनी पक्षाला आणखी बळ दिले. बुधवारी उरल्यासुरल्या उबाठा गटानेही आपल्या परीने वर्धापन दिन साजरा केला. हे दोन्ही मेळावे एकाच दिवशी एकाच सायंकाळी एकाच महानगरात पार पडले. शिंदे यांच्या शिवसेनेने वरळीच्या डोम सभागृहात विशाल मेळावा घेतला आणि आपल्या वाढलेल्या ताकदीची झलक पेश केली. उद्धव ठाकरे यांच्या गटाने माटुंग्याच्या षण्मुखानंद सभागृहात आटोपशीर सभा घेतली. शिंदे यांच्या शिवसेनेच्या मेळाव्यात उत्स्फूर्त आणि उत्साही सहभाग दिसत होता तर ठाकरे यांनी आविर्भाव तेवढा टिकवला असे सर्वसामान्यांचे मत झाले. ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे आपले रडगाणे चालू ठेवले. त्यांचे हे रडगाणे ऐकून महाराष्ट्राला आता कंटाळा आला आहे. तेच गद्दार, खोकी, खंजीर, मर्दमावळे आदी उल्लेख त्यांच्या भाषणात होते. त्यांचे प्रवक्तेही जिभेला हाड नसल्याप्रमाणे बोलत सुटले. पक्षाला खऱ्या अर्थाने उभे करायचे असेल तर त्यांनी आता ठोस कार्यक्रम हाती घेणे हिताचे ठरेल. नुसत्याच टोमणेबाजीमुळे काहीही साध्य होणार नाही. ठाकरे यांची नेहमीची टोमणेबाजी आणि 'बिनशर्ट पाठिंबा' सारखे पाणचट विनोद यामुळे लोकांचे मनोरंजन होतही असेल, पण महाराष्ट्राचे राजकारण पुढे जात नाही. 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो' या प्रारंभीच्या संबोधनाला एकेकाळी टाळ्या पडत असत. हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या मुखातून हे संबोधन ऐकताना लाखो श्रोत्यांचे भान हरपत असे. उद्धव ठाकरेदेखील हेच संबोधन वापरत असत, परंतु काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत घरोबा केल्यानंतर त्यांनी हे संबोधन वापरणे सोडून दिले आहे. ते कशासाठी, हे सारेच जाणतात. कुठल्या गटाचा संघर्ष सत्तेसाठी आहे, आणि कुठल्या गटाची धडपड मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी आहे, हे दोन्ही मेळाव्यांकडे बघितले की कळते. ठाकरे गटासाठी विधानसभा निवडणूक ही अस्तित्त्वाची लढाई ठरणार आहे. जनमानसात धुळीला मिळालेली विश्वासार्हता पुन्हा मिळवणे त्यांना कितपत शक्य होईल, हे आत्ताच सांगणे कठीण आहे. याउलट शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील 'असली' शिवसेना धडाडीने पुढे चाललेली दिसते. वर्धापन दिनाच्या मेळाव्यातील शक्तिप्रदर्शनातून तेच पुन्हा एकदा स्पष्ट झाले.**

# अलिबाग समस्यांच्या विळख्यात





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग हे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. सुंदर समुद्रकिनारा लाभलेले हे शहर मिनी गोवा म्हणून प्रसिद्ध आहे. संपूर्ण भारतातून लाखो पर्यटक दरवर्षी या शहराला भेट देतात. जिल्ह्यातील इतर शहरांच्या तुलनेत अलिबाग शहर स्वच्छ असते, परंतु मागील काही दिवसांमध्ये या शहरात अस्वच्छता दिसू लागली आहे. ठिकठिकाणी कचरा पडलेला असतो. कित्येक दिवस हा कचरा उचलला जात नाही. अस्वछतेबरोबरच इतरही समस्या या शहराला भेडसावत आहेत. अपुरा पाणीपुरवठा, अतिक्रमण आणि बकालीकरण यामुळे नागरी समस्यांमध्ये भर पडली आहे. अलिबाग शहराला समस्यांनी विळखा घातला आहे.

चेंढरे परिसरात तसेच आसपासच्या परिसरात कचऱ्याचा ढीग असतो. तेथील नागरिकांनी तक्रार करूनदेखील हा कचरा उचलला जात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या परिसरात, सतिश इंजिनिअरिंग समोरील रस्त्यावर साठणारे पाणी जाण्यासाठी नगर परिषद कायमचा उपाय शोधू शकली नाही. परिणामी या परिसरात चार महिने घाणेरड्या साचलेल्या पाण्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या मधोमध चालावे लागते. वाहतुकीवर त्यांचा परिणाम होतो. शहरातील डासांचे प्रमाण लक्षात घेता, अशी स्वच्छता मोठ्या प्रमाणावर हाती घेणे गरजेचे आहे. अलिबाग नगर परिषदेने कचरा काढण्याचे कंत्राट दिले आहे. त्या ठेकेदाराची माणसे कोणते रस्ते झाडतात हा संशोधनाचा विषय आहे.

एसटी स्टँडसमोरून व्यायामशाळेत जाणाऱ्या गल्लीत भाजी विक्रेत्या महिला मोठ्या प्रमाणावर बसतात. येथेदेखील घाणीचे साम्राज्य असते. मासळी बजारात जाताना नाक मुठीत धरून जावे लागते. शहरातील पोस्ट ऑफिस आणि धर्मादाय आयुक्त कार्यालय या परिसरातील रस्त्यावर तर दुचाकी दुरुस्तीची गॅरेजेस सुरू झाली आहेत. नगर परिषदेने एसटी स्टँड ते शिवाजी पुतळा हा रस्ता जसा फेरीवाला क्षेत्र केला आहे तसाच हा रस्ताही गॅरेजसाठी अधिग्रहित करून दिला आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. अनेक ठिकाणी दुकानातील माल रस्त्यालगत ठेवून व्यापाऱ्यांनी रस्त्याचा वापर दुकान म्हणून केला आहे. पुरेसा पाणीपुरवठा न होणे, वेळेवर पाणीपुरवठा न होणे या नित्याच्या बाबी आहेत.

अलिबाग शहरात पोलिसांच्या वाहतूक विभागाने विविध ठिकाणी रस्ते दुभाजक ठेवले आहेत. त्यांची दिशा व जागा सातत्याने बदलत असते. या संदर्भात नगर परिषदेला काही भूमिका आहे की नाही, असा प्रश्न पडतो. अलिबाग शहर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित होत आहे असा प्रचार ऐकू येतो. शहरातील एकमेव क्रीडांगण पार्किंगसाठीही वापरास देण्यात आले आहे. शहराच्या अनेक नाक्यांवर होर्डिंग्ज लागतात. ती अनेक दिवस तशीच असतात. अनेक ठिकाणाची होर्डिंग्ज तर धोकादायक स्थितीत असतात. परिणामी अपघातांचा धोका उद्‌भवू शकतो.

अलिबागची लोकसंख्या वाढत असताना काही समस्याही निर्माण होऊ लागल्या आहेत. अलिबागची लोकसंख्या वाढत असली तरी अलिबागचे क्षेत्रफळ मात्र तेवढेच आहे. अलिबागचे क्षेत्र वाढू शकत नाही. पश्चिमेला समुद्र, दक्षिणेला खाडी, उत्तर व पूर्वेस वरसोली, चेंढरे ही गावे. त्यामुळे या शहराचा विस्तार होत नाही. या शहराला भेडसावणारी मुख्य समस्या आहे ती म्हणजे सांडपाण्याचा निचरा. अलिबाग शहर समुद्र सपाटीपासून खाली असल्यामुळे शहरातील सांडपाण्याचा निचरा होऊ शकत नाही. शहरातील गटारे कुठेही एकमेकांना जोडली गेलेली नाहीत. अलिबाग शहरासाठी भुयारी गटाराची योजना मंजूर झाली होती, पण ती पूर्ण होऊ शकलेली नाही. शहरात पिण्याच्या पाण्याची समस्या आता जाणवू लागली आहे.

अलिबागमधील समस्यांबाबत कुणी आवाज उठवत नाही. मागील दोन वर्षे अलिबाग नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट आहे. नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे प्रशासकीय कारभार पाहत आहेत. अलिबागमधील समस्यांबाबत माजी नगरसेवक अमर वार्डे यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र पाठवून शहरातील समस्यांबाबत आवाज उठवला आहे. त्यामुळे तरी नगर परिषद प्रशासनाला जाग येईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# अष्टपैलू अभिनेते अरुण सरनाईक



अरुण शंकरराव सरनाईक हे मराठी चित्रपट-अभिनेते होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म ४ ऑक्टोबर १९३५ रोजी झाला. त्यांचे वडील शंकरराव सरनाईक हे संगीततज्ज्ञ होते, तर त्यांचे काका निवृत्तीबुवा सरनाईक हे प्रख्यात शास्त्रीय गायक होते. गाण्याचे हे अंग त्यांना या जोडीकडूनच मिळाले. त्यामुळे अभिनयात नावारूपास येण्यापूर्वीच त्यांनी पेटी, तबल्यात मातब्बरी मिळवली होती. संगीताची हीच आवड त्यांना कलाक्षेत्रातील दारे उघडण्यास उपयोगी ठरली. तत्पूर्वी मुंबईच्या रुईया महाविद्यालयामधून त्यांनी पदवीही मिळवली. त्यानंतर लेखक-दिग्दर्शक अनंत माने यांनी 'शाहीर परशुराम' चित्रपटात त्यांना एक दुय्यम भूमिका दिली.

या भूमिकेपाठोपाठ लेखक-दिग्दर्शक दिनकर पाटील यांचा 'वरदक्षिणा' आणि दत्ता धर्माधिकारी यांचा 'विठू माझा लेकुरवाळा' हा चित्रपटही त्यांना मिळाला. त्यांनी भूमिका साकारलेले 'रंगल्या रात्री अशा', 'एक गाव बारा भानगडी', 'मुंबईचा जावई', 'केला इशारा जाता जाता', 'सवाल माझा ऐका', 'सिंहासन' इत्यादी चित्रपट विशेष गाजले. राजा ठाकूर दिग्दर्शित 'पाहू रे किती वाट' या चित्रपटात ते डॉ. चारुदत्त या नायकाच्या व्यक्तिरेखेत झळकले तर 'सुभद्राहरण' या चित्रपटात त्यांनी थेट दुर्योधनाचा खलनायक साकारला.

लेखक अरुण साधू यांच्या 'सिंहासन' कादंबरीवर आधारित चित्रपटाची निर्मिती जब्बार पटेल यांनी केली. यात अरुण सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांची साकारलेली व्यक्तिरेखा ही त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वोच्च ठरली! अभिनयातील व्यस्तता एकीकडे कायम ठेवत सरनाईकांनी आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेला छेद दिला नाही. चित्रीकरणातून वेळ मिळाला की कुष्ठरुग्णांसाठी काम करणाऱ्या 'आनंदग्राम'मध्ये ते स्वतःला झोकून द्यायचे. अशा या अष्टपैलू अभिनेत्याचे २१ जून १९८४ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपचे प्रायव्हेट रिप्लाय फीचर काय आहे? जाणून घ्या

व्हॉट्सॲप ग्रुप्स हा मित्र आणि कुटुंबीयांशी संवाद साधण्याचा एक सोयीचा मार्ग आहे. गेल्या काही




महिन्यांत, व्हॉट्सॲपने आपल्या ॲपमध्ये काही मजेदार नवीन फीचर्स जोडले आहेत. यामध्ये दोन GBपर्यंत फाईल शेअरिंग, ॲडमिन कंट्रोल, ग्रुप कॉल्स, डिसपिअरिंग मेसेजेस यासारख्या फीचर्सचा समावेश आहे. बर्याच वेळा असे होते की, जेव्हा युजर एखाद्या ग्रुपमध्ये मेसेज पाठवतो, तेव्हा त्या मेसेजला प्रायव्हेट रिप्लाय द्यायचा असतो. यासाठी प्रायव्हेट रिप्लाय हे फीचर खूप उपयुक्त आहे.

प्रायव्हेट रिप्लाय फीचरद्वारे तुम्ही ग्रुपमध्ये मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीसोबत प्रायव्हेट चॅट करू शकता. अनेकवेळा आपण व्हॉट्सॲप वरील मेसेजला रिप्लाय देतो, तेव्हा त्या ग्रुपमधील बाकीच्या युजर्सना अडचण होते. पण जर तुम्ही प्रायव्हेट रिप्लाय फीचर वापरत असाल तर तुमचे चॅट सुद्धा होईल आणि बाकीच्यांना कोणतीही अडचण येणार नाही. हे फीचर Android, iOS आणि WhatsApp वेब/डेस्कटॉप ॲपवर उपलब्ध आहे.

How to Reply to Private Messages on WhatsApp on Phone? सर्वांत आधी तुमच्या फोनवर WhatsApp ओपन करा. त्यानंतर ग्रुप चॅटवर जा. आता ज्या मेसेजवर तुम्हाला प्रायव्हेट रिप्लाय द्यायचा आहे, त्यावर टॅप करा आणि धरून ठेवा. आता वरच्या उजव्या कोपऱ्यात मेनू बटणावर टॅप करा. त्यानंतर Reply Privately वर निवडा. आता पर्सनल चॅट दरम्यान ज्या मेसेजला तुम्ही सिलेक्ट केले आहे, तो आपोआप कोट होईल. आता नवीन प्रायव्हेट चॅट स्क्रीनवर मेसेज टाइप करा आणि पाठवा.

How to Reply to Private Messages on WhatsApp on WhatsApp Web? आता तुमच्या कॅम्प्युटरवर WhatsApp Web/Desktop app उघडा. आता ग्रुप चॅट वर जा. यानंतर कोणताही मेसेज किंवा मीडियाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यावर क्लिक करा. त्यानंतर Reply privately वर क्लिक करा. आता तुम्ही सिलेक्ट केलेला मेसेज पर्सनल चॅटमध्ये आपोआप दिसेल. नवीन प्रायव्हेट चॅट स्क्रीनवर मेसेज टाइप करा आणि पाठवा.

तुम्ही कोणताही टेक्स्ट, मेसेज किंवा व्हिडिओ मेसेजवर टॅप करून प्रायव्हेट रिप्लाय देऊ शकता. स्क्रीन शॉटवरून स्पष्ट झाल्याप्रमाणे, प्रायव्हेट रिप्लाय फीचरमध्ये ग्रुपमधून मेसेज कोट होते.

# आज जागतिक संगीत दिन



**निमित्त**

संगीत आवडत नाही, संगीताशी आपला काही एक संबंध नाही, असे म्हणणारा मनुष्य क्वचितच सापडेल. कुठेही गाण्यांचा आवाज ऐकताच आपले कान लगेच त्या नादमाधुर्याचा वेध घेतात. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आणि क्षणाक्षणाला संगीत आपल्याला साथ देत असते. नैराश्य, तणावसारख्या आजारांना सामोरे जातो, तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी संगीत मुख्य भूमिका पार पाडत असते. प्रत्येक सुख, दुःखाच्या क्षणी आपल्याला संगीत यथोचित साथ देत असते. जन्मापासून ते अगदी मृत्यूपर्यंत मानवासोबत संगीत असतेच. जीवनातला खरा सोबती संगीत आहे, असे म्हणायला काही हरकत नाही.

आज जे व्यक्ती नैराश्य, तणाव, चिंता अशा परिस्थितीतून जात आहे त्यांना यातून बाहेर पडण्यासाठी संगीताची मदत होत असते. आज आपल्या जीवनाचे कुठलेच असे क्षेत्र नाही जिथे संगीताला महत्त्व नाही. रुग्णालयातील रूग्णांना बरे करण्यासाठी देखील आज म्युझिक थेरपीच कामाला येते आहे. एवढेच काय तर कुठलाही आनंदाचा क्षण साजरा करायला आपण पहिले म्युझिक लावत असतो. मग ती एखादी बर्थ डे, सेलिब्रेशन पार्टी असो किंवा लग्न समारंभ असो.

आपल्या जीवनात संगीताची किती मोठी आणि मोलाची भुमिका आहे? किती अधिक महत्त्व आहे? हे जगातील सर्व लोकांना समजावून सांगण्यासाठी, त्यांना संगीताचे महत्त्व आणि फायदे पटवून देण्यासाठी दरवर्षी हा जागतिक संगीत दिवस साजरा केला जातो. २१ जुनला दरवर्षी जागतिक संगीत दिवसाच्या दिनी अनेक ठिकाणी संगीत प्रेमींसाठी फ्री म्युझिक कॉन्सर्टचे आणि संगीताच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

जगात सर्वात पहिले संगीत दिवस हा फ्रान्स ह्या देशामध्ये २१ जुन १९८२ साली साजरा करण्यात आला होता. फ्रान्स या देशात ह्या दिवसाला फेटे डेला म्युसिकु या नावाने देखील संबोधिले जाते. फ्रान्स ह्या देशामधील फेमस म्युझिक डायरेक्टर मॉरीश फ्लेरोट यांनी तेथील सांस्कृतिक विभागाकरीता हा दिवस साजरा करावयास आरंभ केला होता. दरवर्षी जागतिक संगीत दिवस हा फ्रान्ससमवेत भारतात, ब्रिटनमध्ये, जर्मनीमध्ये, अर्जेंटिना, लक्झेमबर्ग इत्यादी देशांमध्येदेखील दरवर्षी साजरा केला जातो.

मुडफ्रेश करण्यासाठी आपण संगीत ऐकत असतो. जेव्हा आपण रागात असतो नैराश्याने ग्रस्त होऊन ताणतणावात आणि चिंतेत असतो तेव्हा आपण रिलॅक्स होण्याकरीता संगीत ऐकत असतो. बऱ्याच रूग्णालयात आता रूग्णांना बरे करण्यासाठी संगीताचा म्हचजेच म्युझिक थेरपीचा आधार घेतला जातो कारण संगीत ऐकल्याने आपले शरीर हलके होते आणि आपल्याला एकदम रिलॅक्स फिल होत असते.

कुठलाही आनंदाचा तसेच दुखाचा क्षण साजरा करताना आपण पहिले म्युझिक लावत असतो. मग ती एखाद्याची बर्थ डेची पार्टी असो किंवा एखादी सेलिब्रेशन पार्टी किंवा लग्न समारंभ असो. देवाची आराधना पुजा अर्चना करताना देखील आपण म्युझिकचा वापर करत असतो. खूप जण संगीतामधून गायन करून संगीताचे श्रवण करून आपल्या भावना व्यक्त करीत असतात. म्हणजेच आपल्या भावना देखील संगीतादवारेच व्यक्त केल्या जात असतात. काही तज्ञांचे असे म्हणणे आहे की, जर आपणास मायग्रेनची समस्या असेल तर अशा वेळी सुमधुर आणि संगीत ऐकल्याने आपली डोकेदुखी कमी होण्यास मदत होते कारण संगीत ऐकल्याने आपले माईंड शांत आणि रिलॅक्स होत असतो.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**





**उरण : वटपौर्णिमेच्या पूजेसाठी फणसाचे गरे महत्त्वाचे असल्याने फणस खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी दिसत आहे. सध्या फणस ४० रुपये किलो दराने, तर गरे ५० रुपये पाव किलो या दराने विकले जात आहेत.** (छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यातील आजार टाळण्यासाठी आहार बदला



पावसाळ्यात उष्माघात करणाऱ्या उष्णतेपासून सुटका मिळते, पण हा ऋतू जितका आनंददायी वाटतो तितकाच या काळात आजारांचा धोकाही जास्त असतो. या ऋतूत निरोगी राहण्यासाठी आणि आजारांपासून दूर राहण्यासाठी आपण आपल्या खाण्यापिण्याकडे लक्ष देणे सर्वात महत्त्वाचे आहे.

पावसाळ्यात पचनाच्या समस्या आणि अन्नातून विषबाधा होण्याचा धोका जास्त असतो. असे काही पदार्थ आहेत जे पावसाळ्यात खाल्ले तर आरोग्यास त्रास होऊ शकतो. तुमच्या आरोग्याची काळजी घ्यायची असेल तर खाली नमूद केलेले काही पदार्थ पावसाळ्यात अजिबात खाऊ नयेत.

**पालेभाज्या** : पालक, मेथी, अळू, पालक, आणि कोबी यासारख्या पालेभाज्या अतिशय आरोग्यदायी मानल्या जातात, मात्र पावसाळ्यात आर्द्रता आणि पाणी साचल्याने या भाज्या दूषित होतात. बॅक्टेरिया आणि कीटक पालेभाज्यांमध्ये त्वरीत प्रवेश करतात, ज्यामुळे पचनाच्या समस्या उद्‌भवू शकतात. जर तुम्ही पालेभाज्या खाणार असाल तर त्या नीट धुवून शिजवा.

**स्ट्रीट फूड** : स्ट्रीट फूड खाण्यास चवदार असू शकते. पण पावसाळ्यात ते टाळण्याचा सल्ला दिला जातो. रस्त्यावरील खाद्यपदार्थ पूर्णपणे स्वच्छ नसतात, त्यामुळे ते लवकर दूषित होऊ शकतात. चाट, पकोडे, समोसे असे सर्व रस्त्यावरचे पदार्थ आपल्या पचनासाठी चांगले नसतात. आरोग्य तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार, तेलात तळलेले पदार्थ खाल्ल्यास सूज येऊ शकते.

**सीफूड खाऊ नका** : सीफूडप्रेमींनी पावसाळ्यात काळजी घेणे आवश्यक आहे. या हंगामात मासे आणि शंख चटकन दूषित होऊ शकतात. याशिवाय जलप्रदूषणामुळे सीफूडच्या गुणवत्तेवरही परिणाम होतो, त्यामुळे अन्नातून विषबाधा होण्याचा धोका असतो.

**दुग्धजन्य पदार्थ** : पावसाळ्यात आर्द्रतेमुळे दुग्धजन्य पदार्थ खाण्यासही सुरक्षित नाहीत. कच्चे दूध, दही किंवा पनीर यांसारख्या नॉन-पाश्चराईज्ड डेअरी उत्पादनांमध्ये अनेक हानिकारक जीवाणू असतात.

**(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत.)**

# पोलादपूरच्या आपत्ती निवारण आराखड्यात गावांची संख्या वाढविण्याची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोतवाल खुर्द, कोंढवी आणि लोहारे पवारवाडीतील २५ जुलै २००५मध्ये झालेल्या भूस्खलनाच्या घटनांनंतर तालुक्यातील २५ दरडग्रस्त गावांचा नैसर्गिक आपत्ती निवारण आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला आहे, मात्र आता आणखी काही गावेही दरडीच्या छायेखाली असून त्यांचाही समावेश या आराखड्यात करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलादपूर शहरातील गोकुळनगर नवीन विस्तारित गावठाण, पार्ले बौद्धवाडी, लोहारे, लोहारे चव्हाणवाडी, सडवली शिवाजीनगर, धामणदिवी भरणेवाडी, कातळी कामतवाडी, कोंढवी बौद्धवाडी, कोंढवी गावठाण, कोतवाल खुर्द शिंदेवाडी, क्षेत्रपाळ, परसुले बौद्धवाडी, महाळुंगे, बोरावळे पार्टे कोंड, भोगाव येलंगेवाडी, वझरवाडी, पैठण, कालवली, तुटवली, केवनाळे, चरई सुतारवाडी, चरई मुसलमानवस्ती, चरई कासारवाडी, कुडपण बु. मधलीवाडी, कुडपण बु.धनगरवाडी, ओंबळी धनगरवाडी अशी गावे आपत्ती निवारण आराखड्यात समाविष्ट आहेत. या यादीमध्ये करंजे पायटेवाडी, माटवण आदिवासीवाडी, लोहारे पवारवाडी, साखर सुतारवाडी, वाकण मुरावाडी व सानेवाडी, चोळई बुरूडवस्ती,



धामणदिवी गावठाण तसेच दाभिळ या दरडग्रस्त गावांचाही समावेश करण्याची गरज निर्माण झाली आहे.

२००५च्या नैसर्गिक आपत्तीनंतर कायद्याद्वारे आपत्ती निवारण कार्य बंधनकारक झाले आहे. कोतवाल आणि कोंढवी येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन अद्याप पूर्ण झाले नसल्याने याबाबत ग्रामस्थांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आपत्तीकाळात मनुष्यवस्ती सुरळीत ठिकाणी स्थलांतरीत करणे, होड्या तसेच ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य करणारी स्थानिक यंत्रणा निर्माण करणे, पंचनामे व तातडीच्या नागरी सुविधा उपलब्ध करणे, नैसर्गिक आपत्ती निवारण कक्ष तहसील कार्यालयात २४ तास कार्यान्वित ठेवणे आदींपैकी केवळ आपत्ती निवारण कक्ष तहसील कार्यालयामध्ये कार्यान्वित करून केवळ पर्जन्यमान नोंदविण्याचे काम केले जाते.

दळण-वळणात अडथळे निर्माण करणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा उल्लेख या आपत्ती निवारण आराखड्यामध्ये दिसून येत नाही. दरवर्षी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रस्ता खचणे, पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर मार्गावर आंबेनळी घाटात दरडी कोसळणे यामुळे दळणवळणात अडथळे निर्माण करणाऱ्या घटनांचा अहवाल नैसर्गिक आपत्ती निवारणाच्या कामी समाविष्ठ नसल्याचे दिसून येते. काही वर्षांपासून आमसभा बंद होण्यापूर्वीच्या आमसभेत पोलादपूर तालुक्यातील रस्त्यावर दरड कोसळण्याच्या घटनांवर गॅबियन स्ट्रक्चरचे नेटवर्क उभारण्याच्या सूचनेवर काँक्रीटच्या भिंती उभारण्याखेरिज गॅबियन स्ट्रक्चरची कामे झालेली दिसून येत नसल्याने यंदाही घाटमार्ग असुरक्षितच राहणार आहेत.

जिल्हा नैसर्गिक आपत्ती निवारण कक्षाने यापुढे रायगड जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कृती आराखडे सादर करण्याप्रमाणेच पूर्वदक्षतेबाबत सुसज्जतेची हमीदेखील बाळगून नैसर्गिक आपत्ती काळात कार्यरत राहण्याची गरज तालुक्यातून व्यक्त होत आहे.


# दहिवली नवीन पुलामुळे वाहतूक कोंडी सुटणार

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील दहिवली येथील श्रीराम पुलावर मागील काही वर्षे सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. या जुन्या पुलाच्या अगदी बाजूला नवीन पूल उभारला जात आहे. शासनाने या पुलासाठी तब्बल साडेसात कोटींचा निधी मंजूर केला आहे. या पुलाचे काम सुरू असून यामुळे पुलावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघणार आहे.

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर दहिवली गावाच्या हद्दीतील श्रीराम पूल मागील काही वर्षे विकेंडचे दिवशी वाहतूक कोंडीचे केंद्र बनला आहे. आजूबाजूचे रस्ते रूंद झाले आहेत. कर्जत श्रीराम पूल येथील पुलाचा भाग १९७०पासून आहे तेवढाच आहे. त्यामुळे नवीन पुलाच्या कामाला शासनाने मंजुरी दिली आहे.

हे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे, असे वाहनचालकांकडून बोलले जात आहे. उल्हास नदीवरील नवीन पुलासाठी आठ पिलर आहेत, मात्र वर्षभरात केवळ चार पिलर उभे राहिले असून एका पिलरचे काम अर्धवट आहे. त्यामुळे पुलाचे बांधकाम यावर्षी पावसाळ्याआधी होण्याची शक्यता कमी आहे. त्यात ज्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह असतो. या नवीन पुलामुळे श्रीराम पुलावरील वाहतूक कोंडीचे संकट दूर होणार असून सार्वजनिक बांधकाम खात्याने या पुलाचे कामाकडे प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.




**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड पिनकोड ४१०२०६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ व अनुसुची ड कराधान नियम ८, अन्वये ५ (पाच) वर्षा करिता सुधारित कर आकारणीची अंतिम यादी जाहिर प्रसिध्दी बाबत सुचना नोटीस

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड (पुर्वाश्रमिच्या पनवेल नगरपरिषद अंतर्गत) सुधारीत बांधकाम करण्यात आलेल्या मालमत्ताधारकांना व त्यांच्या भोगवटदारांना या जाहीर नोटिसद्वारे कळविणेत येते की, आपल्या भोगवट्यातील इमारती व भुखंडाचे तपासणी करुन करमुल्यांकन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ८ मधील कराधान नियम ९ अन्वये पनवेल महानगरपालिकेने सन २०२३-२४ ते सन २०२७-२८ या पाच वर्षाकरीता इमारतीचे व भुखंडाचे कर निर्धारण करीता करमुल्यांकनाच्या यादीची प्रसिद्धी दिनांक: २०/०६/२०२४ रोजी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ८ कराधान नियम क्र. १५ (१) अन्वये प्रत्येक करदात्यास वैयक्तीस स्तरावर नोटिस बजावण्यात येऊन व उक्त जाहीर प्रसिध्द केलेली आहे. दिनांक: २२/०५/२०२४ रोजी हरकत घेतलेल्या मालमत्ता धारकांची सुनावणी घेण्यात आलेली आहे.

या बाबत आपल्या इमारतीचे किंवा जागेचे, करयोग्य मुल्य अथवा कर आकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ. बाबत हरकत अर्जावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ८ कराधान नियम क्र. १८,१९ अन्वये सुनावणी घेऊन नियम कलम २० अन्वये सुधारित करण्यात आलेली आहे.

तसेच उपरोक्त प्रमाणे सुधारीत करमुल्यांकनासह अंतीम सुधारीत चालु मागणी व मालमत्तांची सन २०२३-२४ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करून सर्व मालमत्ता धारकांना सन २०२३-२०२४ करीताचे देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ८ नियम ३०, ३९, ४० व ४१ अन्वये शास्तीसह यानंतर बजावण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

**संपर्क अधिकारी :-**
१) श्री. महेश गायकवाड (प्र. कर अधिक्षक)
२) भ्रमणध्वनी क्र. १८००-५३२०-३४०
३) फोन क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
४) इ-मेल :- pmc.tax@gmail.com

**सही/-**
**(मारुति गायकवाड)**
उप.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२६६/२६७/२०२४



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल हे सिडको लि. यांच्याकडून वितरीत करण्यात आलेल्या खालील वर्णनाचा भूखंड लिजधारक **श्री. दिगंबर रघुनाथ मुणगेकर** यांच्याकडून मोबदल्यापोटी नोंदणीकृत कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**- भूखंडाचे वर्णन-**
मौजे नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

**गव्हर्नमेंट सव्र्व्हट को. ऑ. हौसिंग सोसायटी, भूखंड नं. ४५, सेक्टर नं. २, क्षेत्र ११९.०० चौ.मी., नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

तरी सदर भूखंडांवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक : २०/०६/२०२४.**

**सही/-**
**ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ.**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला,**
**पनवेल मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१**



**दि पनवेल को अर्बन बँक लि.**

४७१, टिळक रोड, कापड बाजार,पनवेल-रायगड
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८, १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

**जाहीर लिलाव नोटीस**

श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा भरणा न केल्यामुळे सहकारी न्यायालय अलिबाग, रायगड यांच्या कडे दावा क्र. सीसी/आरजीडी/९०/२०२१ निशाणी क्र.३८ दाखल करून बँकेने हुकुमनामा मिळविला आहे. सहकारी न्यायाल्याने सदरील व्यक्तीच्या मिळकती जप्त करून कर्ज रकमा, त्यावरील व्याज व त्यावरील अनुषंगिक खर्च वसूल करण्याचा हुकुम केला आहे. तसेच खाली सही करणाऱ्यानेसुद्धा वेळोवेळी आदेश काढून गहाण ठेवलेली मिळकत दिनांक.१३.०६.२०२३ रोजी जप्त केली आहे.

तरी सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. देवचंद जनार्दन कोळी यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी खालील नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मिळकतीचा लिलाव जसे आहे आणि जेथे आहे त्या परस्थित मंगळवार दि.२३/०७/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता बँकेच्या ४७१, टिळक रोड , कापड बाजार, पनवेल येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन | एरिया |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवचंद जनार्दन कोळी<br>रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२,<br>तक्का, इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे,<br>ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील टक्का येथील शॉप नं. ११, तळमजला, श्री सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स,<br>प्लॉट नं.४२२, तक्का गाव,<br>ता. पनवेल जि. रायगड | ११.१५ स्क्वेअर मीटर<br>( कारपेट एरिया )<br>आणि<br>३.७२ स्क्वेअर मीटर<br>( लॉप्ट एरिया ) |

सदरील कर्जाची दि. ३१.०५.२०२४ पर्यंत थकबाकी रु.२१,३०,७०३/-(अक्षरी एकवीस लाख तीस हजार सातशे तीन रुपये मात्र ) अधिक ०१.०६.२०२४ पासून पुढील होणारे व्याज अधिक होणारा खर्च. माननीय जिल्हा उपनिबंधक साहेब अलिबाग यांनी जरी त्यांच्या आदेशाने सदरील मिळकतीची अपसेट किंमत रु. २१,६०,०००/-एवढी मान्य केली असली, तरी बँकेने दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल यांच्याकडून सदरील मिळकतीचे मुल्यांकन मागविले असता त्यांनी सदर मिळकतीचे रु.२१,६०,०००/-एवढे मुल्यांकन करून दिले आहे त्यामुळे त्यापेक्षा कमी रकमेची बोली रक्कम स्वीकारली जाणार नाही. लिलावात भाग घेणाऱ्यांनी इसारा रक्कम बँकेच्या नावाने बँकेत अनामत रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने रु.१,०८,०००/-वरील लिलावाच्या तारखेच्या किमान ५ दिवसापूर्वी ( कामकाजाच्या दिवशी ) भरणा करावा लागेल जास्तीत जास्त बोली लिलावामध्ये मंजूर केली जाईल.त्यावेळी त्या व्यक्तीला त्याच्या बोली रकमेच्या १/३ रक्कम बँकेत लिलावाच्या तारखेपासून आठ दिवसाच्या आत अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच बाकीची संपूर्ण रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत भरावी लागेल. त्यानंतरच बँक त्यांच्या मिळकतीचा विक्रीचा दाखला देईल. तसेच स्टँम्प ड्युटी, नोंदणी खर्च व इतर खर्च लिलाव घेणाऱ्याने करावयाचा आहे.

कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. लिलावाच्या बाकीच्या सर्व अटी व नियम शाखाधिकाऱ्यांकडे व खालील सही करणाऱ्यांकडे उपलब्ध आहेत व त्या बँकेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आणि त्या लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांस बंधनकारक आहेत याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : २१.०६.२०२४.

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल**



सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | उलवे १२२२ | तरघर १८३/१<br>तरघर १८३/२<br><br>तरघर १८३/३ | ८१/४<br>५३/२<br>५३/५<br>२/५<br>७८/६<br>७९/२ | ०-१४-०<br>०-९-०<br>०-१-०<br>०-८-०<br>०-९-८<br>०-१०-९ | ४५० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र.२१२, सेक्टर-२३, क्षेत्र-४५० चौ.मी. | **मूळ भूधारक कै. कान्हा उर्फ काना मोतीराम कोळी (मयत), कै. अशोक कान्हा कोळी (मयत), कै. महादेव मोतीराम कोळी (मयत), कै. हिराबाई मंगळया कोळी (मयत), कै. गणपत मोतीराम कोळी (मयत), कै. मंगळुबाई मोतीराम कोळी (मयत) व कै. महादुबाई बाळाराम कोळी (मयत) यांचे वारस** १) श्रीमती बेबीबाई कान्हा कोळी, २) श्रीमती स्मिता अशोक कोळी, ३) कु. अभिजीत अशोक कोळी, ४) कु. अक्षता अशोक कोळी, ५) श्रीमती आशा हरिश्चंद्र भगत, ६) श्री. विनोद कान्हा उर्फ काना कोळी, ७) श्रीमती पार्वती महादेव कोळी, ८) श्री. जिवन महादेव कोळी, ९) श्री. हिरामण महादेव कोळी, १०) श्रीमती जयश्री नामदेव कोळी, ११) श्रीमती वंदना नामदेव कोळी, १२) श्रीमती अशल नामदेव कोळी, १३) श्रीमती जोमूबाई गणपत कोळी, १४) श्री. हरेश्वर गणपत कोळी, १५) श्रीमती वासंती रघुनाथ बहिरा, १६) श्रीमती अर्चना उदय कोळी, १७) श्रीमती नुतन धर्मा कोळी, १८) श्रीमती गुलाब रमेश कोळी, १९) श्रीमती अर्चना उदय कोळी व २०) कु. जुईली उदय कोळी | निरंक |
| २ | काळुंद्रे ८४ | | ९४/१<br>९८/२ | ०-१८-०<br>०-३०-० | ४०० चौ.मी. पैकी २०० चौ.मी. | नोड काळुंद्रे, भुखंड क्र. १३५B, सेक्टर-काळुंद्रे, क्षेत्र- २०० चौ.मी | मूळ भूधारक **कै. महिपत महादु दळवी (मयत) यांचे वारस श्रीमती लक्ष्मीबाई महिपत दळवी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. नथुराम महिपत दळवी<br>२) **सौ. सुनंदा श्रीधर परब (मयत) यांचे वारस**<br>२.१) श्रीमती सुजाता चंद्रकांत परब<br>**२.२) सौ. चंदना चंद्रकांत शिंदे (मयत) यांचे वारस**<br>२.२.१) श्री. राहूल चंद्रकांत शिंदे<br>२.२.२) श्री. रोहन चंद्रकांत शिंदे<br>२.३) कु. सेजल सुरेश परब<br>३) **सौ. चंद्रभागा पांडुरंग लाड (मयत) यांचे वारस**<br>**३.१) श्री. राजेंद्र पांडुरंग लाड (मयत) यांचे वारस**<br>३.१.१) श्रीमती कविता राजेंद्र लाड<br>३.१.२) श्री. अभिषेक राजेंद्र लाड<br>३.१.३) श्री. अजिंक्य राजेंद्र लाड<br>४) सौ. माधवी महादेव तोरेसकर<br>५) **सौ. अंजली वसंत चव्हाण (मयत) यांचे वारस**<br>**५.१) श्रीमती विद्या वसंत चव्हाण (मयत) यांचे वारस**<br>५.२) श्रीमती देविका वसंत चव्हाण<br>५.३) श्री. गौरांग वसंत चव्हाण<br>६) सौ. निलम संजय साटम | निरंक |

| अ. क्र. | गाव / निवाडा क्र./ युनिट केस नं. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र व करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र व करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारस | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | करळ ०३/८७ | ११६/५ | ०-५-४ | **४७.२५ चौ.मी. पूर्णांकात ४० चौ.मी** | **भूखंड क्र.९३, सेक्टर- ५१, क्षेत्र ४० चौ.मी.** | **निवाडयावरील सी सी प्रमाणे नावे** श्री. चंद्रकांत दत्तात्रेय तांडेल | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/०४४/२०२४-२५**

निवडक



## नवउद्योजक निर्मितीसाठी मेळावा

**नवी मुंबई** : रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्यम मंत्रालय आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबईतील सुशिक्षित आणि बेरोजगार तरुणांसाठी नव उद्योजक निर्मिती मेळावा आयोजित करण्यात आला होता.रिपब्लिकन पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा पार पडला. या मेळाव्यात एमएसएमईचे अधिकारी प्रफुल्ल उमरे, एमएसआयसीचे अधिकारी महेंद्र मालविया, केंद्रीय मंत्री डॉ. रामदास आठवले यांचे स्विय सहाय्यक प्रवीण मोरे, ठाणे जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिकारी सुजाता मानवटकर तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकारी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस एल. आर. गायकवाड, कार्याध्यक्ष विजय कांबळे, उपाध्यक्ष टिळक जाधव, प्रवक्ते सचिन कटारे, बेलापूर विधानसभा अध्यक्ष मंगेश गायकवाड आदींसह सुशिक्षित युवक उपस्थित होते.

## खारघर येथे बालसंस्कार शाळा



**खारघर** : खारघरच्या युवाप्रेरणा सामाजिक संस्थेतर्फे सेक्टर १९मध्ये गायत्री जयंतीच्या शुभमुहूर्तावर बालसंस्कार शाळा सुरू करण्यात आली आहे. बालसंस्कार शाळेचे उद्‌घाटन युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे संस्थापक किरण प्रकाश पाटील व एरिया कौन्सिलर नेत्रा किरण पाटील यांच्या हस्ते गुरुसत्ता व माता गायत्री यांच्यासमोर दीपप्रज्वलन करून करण्यात आले. खारघर गायत्री परिवाराचे अवधेश नारायण वर्मा यांनी बालसंस्कार शाळेच्या उद्देशाविषयी माहिती दिली. यानंतर पालक व मुलांच्या हस्ते वृक्षारोपण करून बालसंस्कार शाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. डॉ. आरती अग्रवाल यांच्याकडून मुलांना झाडांचे महत्त्व सांगितले. अमितकुमार चौरे यांनी मुलांना योग शिकवला आणि राजेंद्र अग्रहरी यांनी मुलांना जगण्याच्या कलेचे धडे दिले. शाळेच्या शेवटी मुलांना फळांचे वाटप करण्यात आले.

## मॉडर्न स्कूलमध्ये चिमुकल्यांचे स्वागत



**वाशी** : मॉडर्न स्कूल वाशी येथे शैक्षणिक साहित्य देऊन पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांचे नवीन शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यात आले. १५ जूनला प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सुरू झाल्यानंतर गुरुवारी (दि.२०) रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल, वाशी येथील पूर्व प्राथमिक विभागाची शाळा सुरू झाली. आपल्या पालकांपासून काही वेळ लांब जाऊन प्रथमच शाळेची पायरी चढणाऱ्या या चिमुकल्यांच्या स्वागतासाठी शाळेचा परिसर सजविण्यात आला होता. मुलांना शाळेची गोडी वाटावी, यासाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले होते. विद्यालयाच्या प्राचार्य सुमित्रा भोसले यांनी शालोपयोगी भेटवस्तू देऊन चिमुकल्यांचे स्वागत केले. या वेळी पूर्वप्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका मंगल शिंदे आणि शिक्षक उपस्थित होते.

# पावसाळ्यातील आपत्तीबाबत सतर्क रहावे

## नवी मुंबई मनपा आयुक्त कैलास शिंदेंचे आढावा बैठकीत निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

या वर्षी अद्यापपर्यंत समाधानकारक पावसाला सुरुवात झालेली नसून येत्या काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हे लक्षात घेऊन सतर्कता राखावी, असे निर्देशित करीत नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दरडप्रवण क्षेत्राकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश दिले.

विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत आयुक्तांनी नाले व गटारे सफाईच्या कामांचा आढावा घेत नाल्यांच्या प्रवाह क्षेत्रात अजूनही काही झोपड्या शिल्लक असतील तर संबंधित विभाग अधिकाऱ्यांनी पुन्हा पाहणी करावी व संभाव्य हानी टाळण्यासाठी त्या त्वरित हटवाव्यात, असे निर्देश दिले.



महापालिकेच्या मोरबे धरणात आणखी ३९ दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असून पुरेशा पावसाच्या प्रतीक्षेत आपण सगळेच आहोत. त्यानुसार पाणी पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्याची माहिती वेळोवेळी नागरिकांना देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. पावसाळी कालावधीत उद्‌भवणारे आजार लक्षात घेऊन आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात तसेच साथरोगांवरील आवश्यक औषधांची उपलब्धता करून ठेवण्याबाबत आरोग्य विभागास निर्देशित करण्यात आले. पावसाळा लांबल्यामुळे डासांच्या प्रमाणात वाढ होईल, अशी नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेऊन प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

पावसाळा कालावधीत संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी जाहीर केलेल्या अतिधोकादायक इमारतींचा वापर पूर्णपणे थांबविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशित करतानाच आपत्कालीन निवाऱ्याच्या दृष्टीने समाजमंदिरे, विविध भवने व इतर अनुषांगिक जागांची उपलब्धता करणेबाबत तसेच सिडकोकडे यासाठी जागा उपलब्धतेबाबत पाठपुरावा करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

घाटकोपर, मुंबई येथील दुर्घटनेनंतर नवी मुंबई महानगरपालिकेने अत्यंत तत्परतेने अनधिकृत होर्डिंग निष्कासित करण्याची कार्यवाही केली असून नोंदीत ५३पैकी ४७ अनधिकृत होर्डिंग हटविलेले आहेत. उर्वरित चार एमआयडीसी अखत्यारितील होर्डिंगही त्यांचेमार्फत त्वरित हटविण्यासाठी अधिक पाठपुरावा करण्यात यावा असे आयुक्तांनी निर्देशित केले. परवाना विभाग तसेच नगररचना विभाग यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या परवानग्या, परवाने, प्रमाणपत्रे याची माहिती नवी मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर अपलोड करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले. त्याचप्रमाणे जन्मदाखले संबंधितांपर्यंत पोहचविण्यासाठी ऑनलाईन प्रणाली सक्षम करावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले. या सर्व बाबींवर तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

## रबाळे, नेरूळ, वाशी बसथांब्यावर प्रवाशांना करावी लागतेय तारेवरची कसरत



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील रबाळे, नेरूळ व वाशी बसथांब्यावर बस पकडण्यासाठी प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे पावसाळ्याच्या दिवसात प्रवाशांना बस पकडण्यासाठी नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः वृद्ध, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

नवी मुंबईमधील बसथांब्यावर कोणत्याही प्रकारचे खासगी वाहन थांबवू नये, यासाठी परिवहन विभागाकडून नियमावली लागू केली आहे, परंतु शहरातील विविध बसथांब्यांवर खासगी प्रवासी वाहतूक करणारी वाहने उभी करून प्रवासी भरत असतात. यामुळे मनपाच्या बसेसना जागा मिळत नाही. प्रवाशांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रकारचा अनुभव रबाळे, नेरूळ एलपी बस थांबा व वाशी उड्डाणपुलालगत असणाऱ्या बसथांब्यावर प्रवाशांना वारंवार येत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने बस पकडताना प्रवाशांना हाल सहन करावे लागत आहेत.

**राज्य शासनाने आपल्या बसेसमध्ये महिलांना ५० टक्के तिकिट सूट दिली आहे. त्यामुळे साहजिकच महिला वर्गाचे लक्ष शासनाच्या बसेसकडे अधिक असते, मात्र खासगी बसेसमुळे नाहक त्रास सहन करावा लागतो.**
**-संगीता धेंडे, प्रवासी**

**राज्य उपप्रादेशिक परिवहनकडून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियमित कारवाई होत असते. बसथांब्यावर उभे राहून खासगी बसेस प्रवासी घेतात. त्यांच्यावरही कारवाई करण्यात येते. यापुढेदेखील कारवाई करण्यात येईल. सकाळी आणि रात्रीदेखील कारवाई करण्याचे आदेश निरीक्षकांना दिले आहेत.**
**-सुरेंद्र निकम, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई**

## मान्सून कामांची पाहणी करावी

### भाजपच्या माजी नगरसेविका रुपाली भगत यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ नोड येथील प्रभाग ९६मधील पावसाळापूर्व कामांची माहिती मागवून घेण्याची व प्रभाग ९६मध्ये पाहणी अभियान राबविण्याची मागणी भाजपच्या स्थानिक माजी नगरसेविका रुपाली भगत यांनी महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे निवेदनातून केली आहे.



आता नुकतीच कुठे पावसाला सुरुवात झालेली आहे. नेरूळ नोडमधील महापालिका प्रभाग ९६मध्ये नेरूळ सेक्टर १६, १६ए आणि १८ या परिसराचा समावेश होत आहे. या परिसरात पावसाळापूर्व कामांचा एक भाग म्हणून कोठे कोठे वृक्षछाटणी झाली आहे, रस्त्यावरील खड्डे, पदपथाची दुरूस्ती, गटारांची तळापासून सफाई, रस्त्यावरील मल:निस्सारण वाहिन्यांच्या चेंबर्सची झाकणे बदलली आहेत, कोठे पथदिव्यांची कामे केली आहेत, याचा संबंधितांकडून लेखी अहवाल तारीखवार मागवून घ्यावा. पावसाळा कालावधीत येथे नेहमीच झाडांची व फांद्यांची पडझड होत असते. पथदिव्याची समस्या निर्माण होत असते. पावसाळापूर्व कामे काळजीपूर्वक झाली नसल्यास व पावसाळा कालावधीत काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असा इशारा माजी नगरसेविका रुपाली भगत यांनी महापालिका प्रशासनाला दिला आहे.

आम्ही अनेकदा लेखी पाठपुरावा करून थकतो, परंतु महापालिका प्रशासनाकडून येथील रहिवाशांची कामे होत नाहीत. येथील नागरिक पाणीपट्टी, घरपट्टी वेळेवर भरून महापालिका प्रशासनास सहकार्य करीत असतानाही प्रभागातील कामे होत नाहीत. त्यामुळे या ठिकाणी पाहणी अभियान राबवून थेट नागरिकांशी सुसंवाद साधण्याची मागणी माजी नगरसेविका भगत यांनी महापालिका आयक्तांकडे केली आहे.

## पनवेलमध्ये दुचाकीला अपघात

### एकाचा मृत्यू, तर दुसरा जखमी

**पनवेल : वार्ताहर**

ओला इलेक्ट्रिक स्कुटीला झालेल्या अपघातात स्कुटीवरील एकजण ठार तर त्याचा सहकारी जखमी झाल्याची घटना पनवेलजवळील जुना मुंबई-पुणे हायवेवरील अमरधामसमोरील ओव्हर ब्रीजजवळ कळंबोली ते पळस्पे जाणाऱ्या रस्त्यावर घडली आहे.

या रस्त्यावरून ओला इलेक्ट्रिक स्कुटी घेऊन चालले असताना गाडीचा अपघात होऊन या अपघातात मनिष अशोक शेळके (वय २६ रा.पनवेल) हा गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे, तर त्याचा सहकारी आकाश जमादार (वय २६) हा जखमी झाला आहे. त्याला उपचारार्थ नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




## सीवूड्स-दारावे रेल्वे स्टेशनची पूर्वेकडील तिकीट खिडकी सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स-दारावे रेल्वेस्थानकमधील पूर्व दिशेकडील तिकीट खिडकी सुरू करण्याची मागणी रणजित नाईक यांनी रेल्वेकडे केली होती. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. ही मागणी रेल्वे प्रशासनाने मान्य करून तिकीट खिडकी सुरु केल्याने सीवूड्स-दारावे रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

सीवूड्स-दारावे रेल्वेस्थानकामधील पूर्व दिशेकडील तिकीट खिडकी सुरू न केल्यास रेल्वे प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही रणजित नाईक यांनी दिला होता. रणजित नाईक यांच्या मागणीची आणि इशाऱ्याची दखल घेऊन रेल्वे प्रशासनाने त्यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सीवूड्स-दारावे रेल्वेस्थानकमधील पूर्व दिशेकडील तिकीट खिडकी सुरू करण्याचे सकारात्मक आश्वासन दिले होते. त्यामुळे रणजित नाईक यांनी रेल्वे प्रशासनाविरोधातील आंदोलन मागे घेऊन मागणीचा पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर रणजित नाईक यांच्या मागणी आणि पाठपुराव्याला यश आले आहे.



## नेरूळमध्ये ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त प्रवचन

**नवी मुंबई** : कपिलवस्तू बुद्धविहार सेवा समिती यांचे विद्यमाने ज्येष्ठ पौर्णिमानिमित्त भंते प्रज्ञावंत यांचे जाहीर प्रवचन आणि धम्मदेसना शनिवारी (दि.२२) कपिलवस्तू बुद्धविहार, सेक्टर-१० येथे सरचिटणीस एल. आर. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. प्रवचन आणि धम्मदेसना कार्यक्रमास नेरुळ परिसरातील बौद्धधम्म उपासक व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कपिलवस्तु बुद्धविहार महिला सेवा संघ यांनी केली आहे.

## केबीपी कॉलेजमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंबंधी कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई विद्यापीठ आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने १८ व १९ जूनदरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यासंबंधी दोनदिवसीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेचे उद्‌घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता व प्राध्यापक उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यासंबंधी उपस्थितांना मुद्देसूद व महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. डॉ. कुलकर्णी म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे बहुविद्याशाखीय आहे. या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थी सर्जनशील, व्यवसायाभिमुख आणि प्रशिक्षित होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तुत शैक्षणिक धोरण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासही मदत होणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल ठरेल, असे प्रतिपादन केले.

दोन दिवसीय कार्यशाळेत प्राचार्य माधव राजवाडे यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि संरचना या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. रवींद्र बाबर्डेकर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि प्रवेश प्रकिया याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. देवेश शहा यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासंबंधी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. डॉ. हिरेन दंड यांनी केडिमेक क्रेडिट बँक याविषयी मार्गदर्शन केले, तसेच डॉ. शिवराम गर्जे यांनी या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थी व पालकांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजावून सांगितले. दोन दिवसीय कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मुंबई विद्यापीठातील प्रा. सुहास जेजुरकर व केबीपी कॉलेजचे प्रा. सारंग भागवत यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. या कार्यशाळेचा लाभ शिक्षक, विद्यार्थी, पालक, उद्योजक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला. सुमारे ११०० लोकांनी या कार्यशाळेला उपस्थित दर्शवली. दोन दिवसीय कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिभा देवणे, डॉ. अर्चना चव्हाण यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. राजेश्री घोरपडे व उपप्राचार्य प्रा.सी.डी. भोसले यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी केबीपी कॉलेजमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी सहकार्य केले.

## 'महाराज' चित्रपटाचे प्रदर्शन थांबवा!




### श्री गुरूसेवा समिती ट्रस्टची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

यशराज फिल्म्स निर्मित 'महाराज' या चित्रपटाचे प्रदर्शन करू नये या संदर्भात पनवेल शहरातील श्री गुरुसेवा समिती ट्रस्टने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे निषेध मोर्चा काढून मागणीचे निवेदन दिले आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, चित्रपटातील घटनांचे चित्रण १८६२च्या वादग्रस्त महाराज लिबेल केसवर आधारित असू शकते, ज्यात पुष्टीमार्गीय वैष्णव समुदाय आणि सर्वसाधारणपणे सनातन हिंदूंच्या भावना खोलवर दुखावण्याची शक्यता आहे. महाराज बदनामी प्रकरण हा एक अत्यंत संवेदनशील मुद्दा होता, ज्यामुळे १९व्या शतकात सामाजिक अशांतता निर्माण झाली होती. या प्रकरणावर आधारित कोणताही चित्रपट, जर अत्यंत संवेदनशीलतेने आणि अचूकतेने हाताळला गेला नाही, तर जुने वाद पुन्हा पेटू शकतात आणि मोठ्या समुदायाच्या धार्मिक श्रद्धा दुखावू शकतात. वैष्णव व सनातन हिंदूंनी या बाबी विचारात घेण्याची विनंती केली आहे.

ऐतिहासिक तथ्ये चुकीच्या पद्धतीने मांडण्याची आणि आदरणीय व्यक्तींचे नकारात्मक चित्रण तयार करण्याची या चित्रपटाची क्षमता आहे. सामाजिक विसंगती आणि धार्मिक तणाव निर्माण होण्याची शक्यता. महाराज चित्रपटामुळे आपल्या समाजात विनाकारण फूट पडणार आहे, यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी त्यांनी मागणी केली आहे.

या वेळी या संस्थेचे जयसिंग ठक्कर, अमृतलाल शहा, एस. जे. ठक्कर आदींसह मोठ्या प्रमाणात समाजबांधव उपस्थित होते.

# माणगाव येथे नाना पटोलेंचा निषेध

## भाजप महिला मोर्चाकडून घोषणाबाजी

**धाटाव : प्रतिनिधी**

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शेगाव येथे कार्यकर्त्याकडून पाय धुवून घेतल्याच्या निषेधार्थ बुधवारी (दि. १९) भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष हेमा मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव एसटी स्टँडसमोर निषेध व्यक्त करण्यात आला. काँग्रेस हाय हाय, नाना पटोले मुर्दाबाद अशा जोरदार घोषणा या वेळी महिला कार्यकर्त्यांनी दिल्या.

या वेळी हेमा मानकर म्हणाल्या की, खरेतर पटोले यांचे नेतृत्व कार्यकर्त्यांना कसे गुलामगिरी करायला लावते याचे उदाहरण असून त्या व्हायरल व्हिडीओने ही गोष्ट समाजासमोर आली. तरीही पटोले स्वतः असे काही झालेच नाही, असे म्हणत आहेत हे योग्य नाही. समजा चूक झाली तर झाली, ती मान्य करायला काय हरकत आहे, पण तरीही ते मान्य होत न करणे या प्रवृत्तीचा निषेध आहे. काँग्रेस हे कार्यकर्त्यांना गुलाम समजतात हे यावरून स्पष्ट झाले. सातत्याने दिसत आहे. त्या उलट भाजप कार्यकर्त्यांना महत्त्व देऊन पक्ष बांधणीत सामावून घेतात.

या निषेधावेळी महिला मोर्चा सरचिटणीस जयश्री भांड, ममता थोरे, प्रदेश सचिव गोडबोले, तालुकाध्यक्ष अश्विनी कडू, शहराध्यक्ष भारती शेठ, उपाध्यक्ष कुमुद जाधव सरिता जाधव, करिष्मा कदम आदी पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.



# कवठेवाडी येथे वृक्षतोड



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे-नेरळ राज्यमार्गावर कवठेवाडी येथील एका मोकळ्या जमिनीवरील झाडे अचानक जमीनदोस्त झाली आहेत. वन विभागाने दिलेल्या परवानगीपेक्षा दुप्पट झाडांची कत्तल करण्यात आल्याचे वृत्त आहे. त्यामुळे वन विभागाकडून कारवाई व्हावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

कर्जत वन विभागाच्या अंतर्गत कशेळे ग्रामपंचायत हद्दीतील कवठेवाडी येथे नेरळ- कशेळे रस्त्यालगत जंगलतोड झाली आहे. यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून वन विभागाकडे परवाना मागण्यात आला होता. त्यात संबंधित भागातील अन्य शेतकऱ्याच्या जमिनीतील चार ते पाच एकरमधील जुनी झाडे ठेकेदाराने रस्त्याच्या कडेची झाडे तोडण्यासाठी घेतलेल्या परवानगीने तोडून टाकली आहेत.

**संबंधित आदिवासी मालकी जमिनीतील जंगलतोड झालेला माल साठवून ठेवण्यात आला आहे. त्या मालकीची विक्री करण्याची परवानगी आम्ही जिल्हा कार्यलयाकडे मागितली आहे. ती परवानगी आल्यावर मालाचा लिलाव केला जाईल.**

**-रमेश चव्हाण, वनक्षेत्रपाल, कर्जत**

मुळात कवठेवाडी येथील आदिवासी शेतकऱ्याला आपल्या जमिनीमधील झाडांची तोड कोणत्याही कामासाठी करायची नव्हती, मात्र वन विभागाच्या त्या ठेकेदाराने संपूर्ण नऊ एकर जमिनीवरील झाडे तोडून टाकली आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यातील अशा जंगलतोडीबद्दल जिल्हा उपवन संरक्षक यांच्याकडून कारवाई व्हावी, या मागणीसाठी आता पत्रव्यवहार करण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतला आहे.



**माणगाव : विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे आणि भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील हे प्रचाराच्या निमित्ताने आले असता त्यांचे आपल्या निवासस्थानी भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे व नगरसेविका ममता थोरे यांनी स्वागत केले.**

# चोरढे परिसरातील विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**रेवदंडा, मुरुड : प्रतिनिधी**

चोरढे ग्रामपंचायत अंतर्गत सावरोली येथील प्रभात पतसंस्थेमार्फत परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन आणि इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी चार अशा शाळेतील ९८ विद्यार्थ्यांना एकूण ३२ डझन वह्यांचे वाटप केले गेले.

पतसंस्थेकडून चणेरा, धोंडखार, तळेखार, चोरढे, वाघुळवाडी शिरगाव येथील विद्यार्थ्यांना जवळपास ८८ डझन वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास नितीन डाके, अॅड. सचिन पाटील, सुरेश पाटील, दीपक गीते, गोविंद शिंगरे, अनिल पाटील, यश केमसे आदी उपस्थित होते.

वह्यावाटप कार्यक्रमाचे नियोजन शिक्षकवृंद संगीता भगत, विजय जाधव, प्रतिभा वर्तक, राजेंद्र नाईक, रमेश सुभेदार, जयश्री पंची यांनी केले. याबाबत ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.



# योग दिन : इतिहास आणि आरोग्याचे लाभ


आजच्या संगणकीय, स्पर्धेच्या, आधुनिक युगात प्रत्येक व्यक्ती पैशासाठी, कारकीर्द घडविण्यासाठी घड्याळ्याच्या काट्यावर धावत आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक अवस्था शोचनीय झाली आहे. भौतिक सुखाच्या मागे धावत शरीर असंख्य रोगांचे केंद्रस्थान बनले आहे. अशा स्थितीत अनेकांना आरोग्याचे महत्त्व पटू लागले आहे. व्यायामशाळेत जाण्याबरोबरच आता अनेक लोक योगसाधनेकडे वळत आहेत. देश-विदेशातील तरुणात योगसाधनेची क्रेझ वाढली आहे. भारतातही योगाभ्यास करण्याची संख्या वाढत आहे.

भारतात योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पतंजली मुनींच्या काळापासून योगा भारतात रूजत आहे. स्वामी विवेकानंदांनी भारतात तसेच जगभर योगाचा प्रसार केला. आज भारतात स्वामी रामदेवबाबा आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर तसेच विविध योगगुरूंच्या माध्यमातून योगाचा प्रसार होत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४मध्ये २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा व्हावा असा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत मांडला. काही देशांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून हा प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेपुढे ठेवण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधी लाभले. प्रथमच एखाद्या प्रस्तावाला एवढ्या देशांचे प्रतिनिधी लाभले. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका हे देश या प्रस्तावाचे सह प्रतिनिधी आहेत. या प्रस्तावावर सदस्य राष्ट्रांच्या सह्या झाल्यावर २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून घोषित करण्यात आला. हा दिवस जगभरातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व आहे. म्हणून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडण्यात आला. योग ही कोणत्याही धर्माची परंपरा व अभ्यास नसून ती वैज्ञानिक पंथनिरपेक्ष व सर्वंकष जीवनपद्धती आहे. रुग्णांसाठी ही एक चिकित्सा पद्धत तर योगिनसाठी साधना पद्धत, मुक्तीचा मार्ग व जीवनात पूर्णता आणण्याचे हे साधन आहे.

योगाचे सर्वांत महत्त्वाचे फायदे वजनात घट, सशक्त आणि लवचिक शरीर, तजेलदार त्वचा, शांत आणि प्रसन्न मन उत्तम आरोग्य यातली जी गोष्ट तुम्हाला हवी असते ती द्यायला योगा समर्थ आहे. सूर्यनमस्कार, कपालभाती आणि प्राणायाम या योगी क्रियांनी वजन कमी होते. योगाच्या साह्याने वजन कमी करता येते, ताण-तणावापासून मुक्ती होते, रोज आपल्या मनात आणि शरीरात साठवून राहणाऱ्या ताण-तणावाचा निचरा करायचा असेल तर त्यासाठी योगाचा काही मिनिटाचा रोज केलेला सराव पुरेसा असतो. शांतीची अनुभूती घेण्यासाठी रोजच्या धकाधकीच्या कार्यक्रमातून थोडा वेळ काढायला हवा. रोज योग आणि ध्यान केल्याने अस्वस्थ झालेल्या मनाला काबूत आणण्यासाठी योगासारखा दुसरा उपाय नाही. शरीराचे संपूर्ण संतुलनयोगामुळे होते. योगामध्ये सुप्त ज्ञान शक्ती व अन्य दिव्य शक्ती जाग्या होतात. योगामुळे अशुभ व अज्ञान दुर होते.

योग हे मनुष्याच्या बाह्य व आंतरिक विकास घडवून आणण्याचे सर्वांगीण साधन व माध्यम आहे. रोगमुक्त, तणावमुक्त, व्यसनमुक्त राहण्यासाठी आणि आयुष्यात सुख, समृद्धी व शांतता आणण्यासाठी सकाळी व संध्याकाळी एक तास योगासाठी देणे आवश्यक आहे. तर ते जे करतात त्यांच्या जीवनात प्राधान्य आपोआपच पूर्ण होऊ लागतात.

योगामुळे आपले शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन राखले जाते. योग हा तणावमुक्त, व्यसनमुक्त आणि निरोगी जीवनाचा मार्ग आहे. चला, आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करूया आणि आनंदी व समृद्ध आयुष्य जगूया. आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करूनया प्राचीन परंपरेला मान देऊया.



**-एच. एन. पाटील**
(उपशिक्षक)
तु.ह. वाजेकर विद्यालय, फुंडे, ता. उरण

## 'केएमसी'च्या एनसीसी कॅडेट्सचे यश

**खोपोली : प्रतिनिधी**

पाच महा गर्ल्स बटालियन एनसीसी मुंबई-अ (सीएटीस) कॅम्प ४०४मध्ये खोपोली केएमसी कॉलेजच्या एनसीसी कॅडेट्सने विविध ठिकाणी झालेल्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये कॅम्पमध्ये आलेल्या सर्व कॉलेजमधून परेडमध्ये केएमसी कॉलेजचे कॅडेट्स विजयी झाले.

सोलो संगीत स्पर्धेत केएमसी कॉलेजच्या एनसीसी कॅडेटने प्रथम क्रमांक पटकावला. आणि खो खो या खेळातसुद्धा प्रथम क्रमांक मिळवला. कॅडेट अफसाना शाह आणि मयुरी जाधव या रिपब्लिक डे कॅम्पसाठी निवडले गेले. कॅडेट धनश्री पाटील ही थल सेना कॅम्पसाठी निवडली गेली. शर्वरी राजेंद्र शेवाळे ही कॅडेट केएमसी कॉलेजकडून नॅशनल ट्रेकिंग कॅम्पसाठी उटी (तामिळनाडू) येथे गेली होती.

या सर्व कॅडेट्सचे केएमसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, एनसीसी एनओ शीतल गायकवाड तसेच खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम उपाध्यक्ष अबू जळगावकर, सेक्रेटरी किशोर पाटील, कॉलेजचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, संचालक यशवंत साबळे, गुरव, हडप यांनी अभिनंदन केले.




## माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी रोह्यातील कामांची केली पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात विविध विकासकामे सुरू आहेत. या विकासकामांची बुधवारी (दि. १९) माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी पाहणी केली.

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीत मोठ्या प्रमाणात विकासकामे खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून करण्यात येत आहेत. कुंडलिका नदी संवर्धन येथे होत असलेले शिवस्मारक, नगर परिषद व्यवसायिक संकुल, भुवनेश्वर येथील क्रिडांगण, बायापास रस्ता, हनुमान मंदिर, रोहा बसस्थानक येथील गटार आदी कामांची पाहणी या वेळी केली.

या पाहणीवेळी मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी गटनेते महेंद्र गुजर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, ओंकार भुरुण यांच्यासह माजी नगरसेवक, नगर परिषद अधिकारी उपस्थित होते.





**पाली : रायगडच्या खासदारपदी सलग दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल सुनील तटकरे यांना तंटामुक्त समिती अध्यक्ष व भाजप कार्यकर्ते ज्ञानेश्वर फोंडे यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेवक सुलतान बेणसेकर.** (छाया : धम्मशील सावंत)


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल**

### ताबा सूचना

**(स्थावर मालमत्तेकरिता)**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियमन, २००२ नुसार)**

ज्याअर्थी,
मी, श्री. नितिन जिवन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ९ आणि कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारा/रांकडे प्रत्येक खात्यासमोर उल्लेखिलेली रक्कम सूचनेच्या दिनांकापासून/ सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.
कर्जदारसदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की,याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमनाच्या नियम ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्याच्या समोर उल्लेखिलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्ते/त्तांबाबत कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेचा दिनांक | ताबा सूचना चिटकवण्याचा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. बलराम कृष्णा पाटील (कर्जदार) श्री. सुशिल जगन्नाथ पाटील (जामीनदार) श्री. किरण हलधार पाटील (जामीनदार) श्री. शिरिष भाऊ कडू (जामीनदार) | बलराम कृष्णा पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृ छाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि., क्षेत्रफळ - ११४२ चौ.फू., सीटीएस क्र. ११९१ आणि सीटीएस क्र. ११९१/१, पनवेल, तालुका - पनवेल, जि.- रायगड. | १५.०३.२०२४ | १८.०६.२०२४ (सांकेतिक) | दि. २९.०२.२०२४ रोजीनुसार रु. १८,७७,७८३/- (रुपये अठरा लाख सत्त्याहत्तर हजार सातशे त्र्याऐंशी मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१२.२०२० ते ३१.०५.२०२३पर्यंतचे व्याज. रु. ६,३०,९५२/- (रुपये सहा लाख तीस हजार नऊशे बावन्न मात्र) आणि दि. ०१.०३.२०२४ पासूनचे त्यावरील व्याज |
| २ | मे. रोहित एन्टरप्राईजेस (कर्जदार) श्री. रोहित गजानन जितेकर (प्रोप्रायटर) श्री. गजानन चंदर जितेकर (जामीनदार) श्री. नामदेव महादेव ठाकूर (जामीनदार) | रोहित गजानन जितेकर यांच्या नावे असलेली, ग्रामपंचायत दापोली, मालमत्ता क्रमांक ४५/२बी, क्षेत्रफळ - ५५८ चौ.फू., गाव दापोली, ता. पनवेल, जि. रायगड. | १८.०४.२०२४ | १८.०६.२०२४ (सांकेतिक) | दि. ३१.०३.२०२४ रोजीनुसार रु. २४,९४,७६६/- (रुपये चोवीस लाख चौऱ्याण्णव हजार सातशे सहासष्ट मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०४.२०२४ पासूनचे व्याज. |
| ३ | श्री. रोहित मधुकर चितळे (कर्जदार), सौ. मालती मधुकर चितळे (कर्जदार), सौ. अनिता अनंत जाधव (जामीनदार) श्री. अरुण चिंतामणी कांबळे (जामीनदार) | श्री. रोहित मधुकर चितळे आणि सौ. मालती मधुकर चितळे यांच्या नावे असलेले घर क्र. ८१-००१, गाव - वडघर, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. क्षेत्रफळ - ४२१ चौ.फू. | ०४.०५.२०२४ | १८.०६.२०२४ (सांकेतिक) | दि. ३०.०४.२०२४ रोजीनुसार रु. ६,२५,२९५/- (रुपये सहा लाख पंचवीस हजार दोनशे पंचाण्णव मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०५.२०२४ पासूनचे व्याज. |

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**दिनांकः १८.०६.२०२४**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# इंग्लंडचा विंडीजवर दमदार विजय

**सेंट ल्युसिया : वृत्तसंस्था**

सुपर ८ फेरीसाठी पात्र होताना दमछाक झालेल्या इंग्लंडने या फेरीत दाखल होताच यजमान वेस्ट इंडिजवर आठ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला. वेस्ट इंडिजने दिलेले १८० धावांचे लक्ष्य इंग्लंडने १५ चेंडू आणि आठ विकेट्स राखून पार केले. इंग्लंडचा सलामीवीर फिल सॉल्टने ४७ चेंडूत नाबाद ८७ धावांची खेळी करीत या विजयाचा पाया रचला.




१८१ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य मिळालेल्या इंग्लंडला कर्णधार जोस बटलर आणि फिल सॉल्ट यांनी ६७ धावांची खणखणीत सलामी दिली. रॉस्टन चेसने बटलरने पायचीत केले. तो २२ चेंडूत २५ धावा करून बाद झाला. तिसऱ्या क्रमांकावर संधी मिळालेल्या मोईन अलीने १३ धावा केल्या आणि रसेलच्या गोलंदाजीवर तो बाद झाला. ८४/२ अशा स्थितीत बेअरस्टो सॉल्टला साथ देण्यासाठी मैदानात उतरला. धावगतीचे आव्हान वाढत होते, पण या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ४४ चेंडूंत ९७ धावांची भागीदारी करीत वेस्ट इंडिजच्या आक्रमणातली हवाच काढून घेतली. १६व्या आणि रोमारिओ शेफर्डच्या दुसऱ्या षटकात सॉल्टने ३० धावा कुटल्या आणि संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. सॉल्टने या षटकात ४, ६, ४, ६, ६, ४ अशा पद्धतीने मनमुराद फटकेबाजी केली.

फिरकीपटू रॉस्टन चेस चांगली गोलंदाजी करीत असताना कर्णधार पॉवेलने त्याला बाजूला करुन अल्झारी जोसेफला आणले. सॉल्ट-बेअरस्टो जोडीने जोसेफच्या दुसऱ्या षटकात १४ धावा काढल्या. त्याच्या पुढच्या षटकात या जोडीने अकेल हुसेनच्या गोलंदाजीचा समाचार घेत १६ धावा कुटल्या. बेअरस्टोने २६ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ४८ धावा केल्या.

तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सेंट ल्युसियाच्या खेळपट्टीवर इंग्लंडच्या गोलंदाजांची अतिशय विचारपूर्वक मारा केला. निर्धाव चेंडूंवर भर देत इंग्लंडने वेस्ट इंडिजच्या धडाकेबाज फलंदाजांना रोखले. जॉन्सन चार्ल्ससारख्या तडाखेबंद खेळासाठी प्रसिद्ध फलंदाजांला इंग्लंडने जखडून ठेवले. इंग्लंडने त्याला ३४ चेंडूंत ३८ धावाच करू दिल्या. ब्रँडन किंग २३ धावा करुन दुखापतग्रस्त होऊन तंबूत परतला.

मागच्या लढतीत ९८ धावांची खेळी करणाऱ्या निकोलस पूरनने ३२ चेंडूंत ३६ धावा केल्या, पण त्यालाही सूर गवसला नाही. कर्णधार रोव्हमन पॉवेलने १७ चेंडूंत पाच षटकारांसह ३६ धावा ठोकल्या. स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध आंद्रे रसेल अवघी एक धाव करून माघारी आला. शेरफन रुदरफोर्डने १५ चेंडूंत एक चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद २८ धावांची खेळी केली. रुदरफोर्डच्या खेळीमुळे वेस्ट इंडिजने पावणेदोनशेचा टप्पा ओलांडला.

## युरो कपमध्ये पोर्तुगालची चेक प्रजासत्ताकवर मात



**लेइपझिग : वृत्तसंस्था**

बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या युवा फ्रान्सिस्को कॉन्सेसाओने केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर पोर्तुगालने चेक प्रजासत्ताकवर २-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवताना युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेतील आपल्या मोहिमेस यशस्वी सुरुवात केली.

पोर्तुगाल संघाला चेक प्रजासत्ताक संघाकडून कडवा प्रतिकार सहन करावा लागला. पोर्तुगालचे प्रशिक्षक रोबर्टो मार्टिनेझ यांनी ९०व्या मिनिटाला कॉन्सेसाओला मैदानावर उतरवले. २१ वर्षीय कॉन्सेसाओने निर्णायक योगदान देताना ९२व्या मिनिटाला विजयी गोल नोंदवला. कॉन्सेसाओप्रमाणेच बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या पेड्रो नेटोने डाव्या बाजूने चेंडू गोलच्या दिशेने मारण्याचा प्रयत्न केला. त्याने मारलेला चेंडू चेक प्रजासत्ताकचा बचावपटू रॉबिन हर्नाकच्या पायाला लागून गोलच्या अगदीच समोर असलेल्या कॉन्सेसाओकडे गेला आणि त्याने चेंडू गोलजाळ्यात मारण्यात कोणतीही चूक केली नाही.

या विजयी गोलपूर्वी मात्र पोर्तुगालला चेक प्रजासत्ताक संघाने चांगलेच झुंजवले. उत्तरार्धात ६२व्या मिनिटाला लुकास प्रोवोडने गोल नोंदवत चेक प्रजासत्ताकला अनपेक्षित आघाडी मिळवून दिली, मात्र ६९व्या मिनिटाला रॉबिन हर्नाककडून झालेल्या स्वयंगोलमुळे पोर्तुगालने १-१ अशी बरोबरी साधली. यानंतर कॉन्सेसाओने भरपाई वेळेत गोल नोंदवत पोर्तुगालला विजय मिळवून दिला.

**रोनाल्डोचा विक्रम**

पोर्तुगालच्या ख्रिास्तियानो रोनाल्डोने आणखी एक विक्रम आपल्या नावे केला. रोनाल्डो यंदा कारकीर्दीतील सहाव्या युरो स्पर्धेत खेळत असून अशी कामगिरी करणारा तो पहिलाच खेळाडू आहे. युरो स्पर्धेत सर्वाधिक सामने (२६) आणि सर्वाधिक गोल (१४) हे विक्रम आधीच रोनाल्डोच्या नावे आहेत.

## स्मृती मानधनाने इतिहास रचला

### वनडेत सलग दोन शतके झळकवणारी पहिली भारतीय महिला



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय दौऱ्यावर आलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाविरुद्ध भारताने सलग दुसरा मोठा विजय मिळवला. या सामन्यातही भारताची उपकर्णधार स्मृती मानधनाची बॅट तळपली आणि तिने पुन्हा शतक झळकावले. यासह तिने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. सलग दोन एकदिवसीय शतके करणारी मानधना ही पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

दुसऱ्या वनडेमध्ये मानधनाने १०३ चेंडूंत शतक झळकावले असून हे तिचे एकदिवसीय कारकिर्दीतील सातवे शतक होते. मानधनाने १८ चौकार आणि दोन षटकारांसह १३६ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. मागील सामन्यातही तिने १२७ चेंडूंत ११७ धावा केल्या होत्या. मानधनाने सलग दोन सामन्यात शतके ठोकून अशी कामगिरी करणारी ती पहिली महिला भारतीय फलंदाज ठरली आहे. यापूर्वी वनडेत अशी कामगिरी कोणत्याही भारतीय महिला फलंदाजाला जमलेली नाही.

मानधनाने वनडेमध्ये सात शतके झळकावली असून यासह तिने माजी भारतीय कर्णधार मिताली राजची बरोबरी केली आहे, तर वनडेमध्ये सात शतके झळकावणारी मानधना ही पहिली भारतीय सलामीवीर आहे.

## अमेरिकेने द. आफ्रिकेला झुंजवले; अँड्रियस गौसची झुंज अपयशी

**ॲटिग्वा : वृत्तसंस्था**

भेदक गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने अमेरिकेवर विजय मिळवला, पण शानदार कामगिरीसह अमेरिकेने आफ्रिकेला सहज विजय मिळवू दिला नाही. हरमीत सिंग आणि अँड्रियस गौसच्या भागीदारीने आफ्रिकेला घाम फोडला, पण संघाने अखेरीस १८ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करीत दक्षिण आफ्रिकेने क्विंटन डीकॉकच्या ७४ धावा आणि मारक्रमच्या ४६ धावांसह चार बाद १९४ धावांचा डोंगर उभारला. अमेरिकेने कडवी झुंज देत या लक्ष्याचा पाठलाग करताना ६ बाद १७६ धावा करू शकले.



दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिका संघाने ७१ धावांत चार विकेट गमावल्या. यामध्ये स्टीव्हन टेलर (२४), नितीश कुमार (८), कर्णधार आरोन जोन्स (०) आणि कोरी अँडरसन (१२) यांच्या विकेट्सचा समावेश आहे. कर्णधार ॲरोन जोन्स खातेही न उगडता बाद झाला, ज्याचा संघाला मोठ फटका बसला, कारण जोन्स यंदाच्या विश्वचषकात अमेरिकेसाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. यानंतर अँड्रियस गौस (नाबाद ८०) आणि हरमीत सिंग (३८) यांनी सहाव्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी करीत संघाला सामन्यात कायम ठेवले.

अखेरच्या दोन षटकात अमेरिकेला विजयासाठी २८ धावांची गरज होती. पण कागिसो रबाडाने टाकलेल्या १९व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर हरमीत झेलबाद झाला आणि त्यानंतर अमेरिकेचा संघ मागे पडला. त्यानंतर विजयासाठी शेवटच्या षटकात त्यांना २६ धावा करायच्या होत्या, मात्र संपूर्ण २० षटके खेळून संघाला सहा विकेट्सवर केवळ १७६ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून रबाडाने चार षटकांत १८ धावा देत तीन विकेट घेतल्या. त्यांच्याशिवाय केशव महाराज, एनरिक नॉर्किया आणि तबरेझ शम्सी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी सलामीवीर क्विंटन डी कॉकचे (७४ धावा) विस्फोटक अर्धशतक आणि कर्णधार एडन मारक्रमच्या दुसऱ्या विकेटसाठी ६० चेंडूंत केलेल्या ११० धावांच्या भागीदारीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने चार बाद १९४ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारत अमेरिकेला मोठे आव्हान दिले. डी कॉकने संथ आणि फिरकीपटूंसाठी योग्य समजल्या जाणाऱ्या खेळपट्टीवर अमेरिकन गोलंदाजांचा धुव्वा उडवला आणि ४० चेंडूंच्या डावात सात चौकार आणि पाच षटकार मारून स्पर्धेतील पहिले अर्धशतक झळकावले. सलामीवीर डिकॉकशिवाय मारक्रमने ४६ धावा केल्या, तर हेनरिक क्लासेनने नाबाद ३६ आणि ट्रिस्टन स्टब्सने नाबाद २० धावा केल्या आणि पाचव्या विकेटसाठी ५३ धावांची नाबाद भागीदारी केली. अमेरिकेकडून सौरभ नेत्रावळकर आणि हरमीत सिंग यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

## सेहवागकडून पाकिस्तानच्या क्रिकेट पॉलिसीवर प्रश्नचिन्ह



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तानी संघाला यंदाच्या ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेत साखळी फेरीपर्यंतच समाधान मानावे लागले. सुरुवातीला पाकिस्तानचा अमेरिकेने पराभव केला. त्यापाठोपाठ भारतानेही त्यांना पराभवाची धूळ चारली. पाकिस्तानने आयर्लंड आणि कॅनडाविरोधात विजय मिळवला, पण तरीही त्यांना साखळी फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. पाकिस्तानी खेळाडूंना चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. अशातच भारताचा माजी खेळाडू वीरेंद्र सेहवागने पाकिस्तानच्या क्रिकेट बोर्डाचा पर्दाफाश केला.

सेहवाग 'क्रिकबज'वर म्हणाला की, वहाब रियाज आणि मोहम्मद आमिर हे दोघे पाकिस्तानातील वृत्तवाहिनीवर बोलताना याच पाकिस्तान संघावर टीका करायचे. आता हे दोघेही पाकिस्तानच्या संघाचा भाग आहेत. जेव्हा ते संघाबाहेर होते तेव्हा अनेकांना क्रिकेट कसे खेळायचे याचे सल्ले देत असत. आज एक निवडकर्ता आणि एक प्लेइंग इलेव्हनमध्ये आहे. मग त्यांनी संघासाठी काय योगदान दिले. केवळ इमाद वसीमसारख्या जवळच्या सहकाऱ्यांना संघात संधी दिली. समजा आज अजित आगरकर अध्यक्ष असता आणि तो बोलला की, वीरू ये तुचे पुनरागमन करतो. हे असे नाही होऊ शकत. निवडकर्ता जो असतो त्याने भविष्याचा विचार करणे गरजेचे असते. ते पाकिस्तानी संघात होत नाही.

## भारतीय महिला क्रिकेट संघाची विजयी आघाडी

### द. आफ्रिकेला दुसऱ्यांदा हरवले; स्मृती, हरमनप्रीतची शानदार शतके

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांच्या तडाखेबंद शतकी खेळीच्या बळावर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर चार धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. भारतीय संघाने दिलेले डोंगराएवढ्या लक्ष्याला सामोरे जाताना दक्षिण आफ्रिकेच्या दोन शिलेदारांनीही शतकी खेळी साकारल्या, पण भारतीय संघाने टिच्चून खेळ करीत सामन्याचे पारडे फिरवले.




भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ३२५ धावांचा डोंगर उभारला होता. स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटसाठी केलेली १७१ धावांची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. स्मृतीने १८ चौकार आणि दोन षटकारांसह १३६ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली, तर हरमनप्रीतने नऊ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद १०३ धावांची दिमाखदार खेळी केली. ऋचा घोषने १३ चेंडूंत २५ धावा चोपल्या आणि भारतीय संघाने सव्वातीनशेचा टप्पा ओलांडला.

या प्रचंड लक्ष्यासमोर खेळताना दक्षिण आफ्रिकेने विकेट्स गमवायला सुरुवात केली, पण लॉरा वॉल्व्हडार्टने १२ चौकार आणि तीन षटकारांसह १३५ धावांची शानदार खेळी केली. मारिझान कापने ९४ चेंडूंत ११ चौकार आणि तीन षटकारांसह ११४ धावांची अविश्वसनीय खेळी साकारली. या दोघींनी स्मृती-हरमनप्रीतप्रमाणे चौथ्या विकेटसाठी १८४ धावांची खंडप्राय भागीदारी रचली. मारिझान बाद झाल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करीत पुनरागमन केले. लॉराने एका बाजूने चिवटपणे लढा दिला. शेवटच्या षटकात आफ्रिकेला सहा चेंडूंत ११ धावांची आवश्यकता होती, पण पूजा वस्त्राकरने दोन विकेट्स घेत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. दक्षिण आफ्रिकेला अवघ्या चार धावा कमी पडल्या. भारताकडून पूजा आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स पटकावल्या.

या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. पहिल्या लढतीतही स्मृतीने दिमाखदार शतक झळकावले होते. भारतीय संघाने त्या लढतीत १४३ धावांनी विजय मिळवला होता. तिसरा सामना २३ जूनला बंगळुरू येथेच होणार आहे.

## भारताचे माजी क्रिकेटपटू डेव्हिड जॉन्सन यांचे निधन



**बंगळुरू** : भारत आणि कर्नाटक संघाचे माजी वेगवान गोलंदाज डेव्हिड जॉन्सन (५२) यांचे बंगळुरू येथे निधन झाले. त्यांनी भारतासाठी दोन कसोटी सामने खेळले आणि तीन विकेट घेतल्या. १९९६मध्ये भारतासाठी दोन कसोटी सामने खेळणारे जॉन्सन आरोग्याच्या समस्यांशी झुंज देत होता आणि तीन दिवसांपूर्वी त्याला स्थानिक रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले आहेत.

उपलब्ध तपशीलानुसार जॉन्सन, जे त्यांच्या घराजवळ क्रिकेट अकादमी चालवत होते. अलिकडच्या काही दिवसांपासून बरे नव्हते. ते त्याच्या अपार्टमेंटच्या चौथ्या मजल्यावरून पडले होते. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले, ज्यामुळे पोलिसांना आत्महत्या केल्याचा संशय असल्याचे बोलले जात आहे.




## अमेरिकेविरूद्धच्या सामन्यात बाबर आझमने केले फिक्सिंग?

### पाकिस्तानच्या ज्येष्ठ पत्रकाराचा आरोप

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट पुन्हा एकदा नव्या वादात सापडले आहे. गेल्या टी-२० विश्वचषकाचा उपविजेता पाकिस्तान संघ स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत बाहेर पडला. याच दरम्यान पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमवर मॅच फिक्सिंगचा आरोप करण्यात आला आहे. आझमने अमेरिकेविरूद्धचा सामन्यात फिक्सिंग केल्याचा आरोप होत आहे.

पाकिस्तान संघाला पहिल्याच सामन्यात अमेरिकेविरूद्ध सुपर ओव्हरमध्ये मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले आणि नंतर भारताविरुद्ध पराभव पत्करावा लागला. यानंतर त्यांनी निश्चितपणे कॅनडा आणि आयर्लंडचा पराभव केला, मात्र संघ सुपर ८ फेरीसाठी पात्र होऊ शकला नाही. आता संघाच्या कामगिरीवरून पाकिस्तानवर ताशेरे ओढण्यात येत आहेत.




पाकिस्तानमध्ये सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये पाकिस्तानच्या अमेरिकेविरुद्धच्या पराभवानंतर बाबर आझमला अमेरिकेकडून महागड्या भेटवस्तू मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. पाकिस्तानचे ज्येष्ठ पत्रकार मुबशीर लुकमान यांनी हा आरोप केला आहे. या आरोपांसह त्यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

या व्हिडीओमध्ये लुकमान यांनी पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमवर अमेरिकेविरूद्धचा सामना हरल्यामुळे महागड्या भेटवस्तू मिळाल्याचा आरोप केला आहे. या टी-२० विश्वचषकातील पाकिस्तानचा हा पहिलाच सामना होता आणि जो बरोबरीत आल्याने सामन्याचा निर्णय सुपर ओव्हर खेळवून घेण्यात आला आणि पाकिस्तानचा येथे सामना गमवावा लागला.

अमेरिकेकडून पराभूत झाल्यानंतर आयर्लंडविरूद्धचा निकराचा सामना जिंकल्यानंतर त्यांच्या शंका आणखी वाढल्याचे लुकमान यांनी सांगितले. लुकमान यांचा दावा आहे की. बाबरला सट्टेबाजांकडून एक ऑडी कार मिळाली आहे, जी तो त्याच्या भावाकडून भेट असल्याचे सांगत आहे. त्यांनी सांगितले की, बाबरची ऑडी ई-ट्रॉन, जी त्याने त्याला त्याच्या भावाने भेट म्हणून दिली होती ती संशयास्पद बुकींकडून विकत घेतली होती, तर त्याला ऑस्ट्रेलिया आणि दुबईमध्ये अपार्टमेंटदेखील मिळाले होते.

व्हायरल व्हिडीओत मुबशीर लुकमान म्हणत असल्याचे दिसत आहे, 'काही दिवसांपूर्वी मी पाहिले बाबरकडे ऑडी ई-ट्रॉन कार आहे, जी खूप चांगली कार आहे. आझम म्हणाला, माझ्या भावाने ही कार दिली आहे. तेव्हा मला वाटले की बाबरचा भाऊ काही मोठे काम करीत असेल, जेणेकरून तो सात-आठ कोटी रुपयांची कार गिफ्ट करीत आहे, पण चौकशी केली असता बाबरचा भाऊ असे कोणतेही काम करीत नसल्याचे कळले.

## भारतीय संघाचे वर्ल्डकपनंतरचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने २०२४-२५ वर्षातील भारताच्या पुरुष क्रिकेट संघाच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या वेळापत्रकाची घोषणा केली. ट्वेन्टी-२० वल्डकप स्पर्धेनंतर भारतीय संघ झिम्बाब्वे व श्रीलंकेचा दौरा करणार आहे. त्यानंतर घरच्या मैदानावर बांगलादेश, न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्याविरुद्ध एकूण पाच कसोटी, आठ ट्वेन्टी-२० व तीन वनडे सामने खेळणार आहे.

वर्ल्डकपनंतर भारतीय संघ पाच ट्वेन्टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी झिम्बाब्वे दौऱ्यावर, तीन वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी श्रीलंका दौऱ्यावर, पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाईल. त्यानंतर घरच्या मैदानावर सामने खेळणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com